भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भूमिसंपादन अधिनियम, १८९४

(सन १८९४ चा अधिनियम क्रमांक १)

[दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान]

# The Land Acquisition Act, 1894

## (Act No. 1 of 1894)

[As in force on 1st March 1991]

(महाराष्ट्र विशोधनांसहित)

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९९२

[किंमत : रु. ५.२५]

## प्रावकथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला दि लँड अॅक्विझेशन अॅक्ट, १८९४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड २, अंक १ दिनांक २७ मार्च १९९१ यात पृष्ठे ३ ते २८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २७ मार्च १९९१.

व्ही. एस. रमा देवी,
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Land Acquisition Act, 1894 as on the 1st March 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the **Gazette of India** Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 2, dated 27th March 1991 on pages 3 to 28.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

V. S. RAMA DEVI,
Secretary to the Government of India.

New Delhi :
Dated 27th March 1991.

# भूमिसंपादन अधिनियम, १८९४

## केंद्रीय विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. भारतीय वीज अधिनियम, १९१० (१९१० चा ९).

२. विकेंद्रीकरण अधिनियम, १९१४ (१९१४ चा ४).

३. निरसन व विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०).

४. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९१९ (१९१९ चा १७).

५. प्रक्रांति अधिनियम, १९२० (१९२० चा ३८).

६. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९२१ (१९२१ चा १९).

७. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९२३ (१९२३ चा ३८).

८. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९३३ (१९३३ चा १६).

९. भारत शासन (भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९३७.

१०. निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १).

११. भारतीय स्वतंत्रता (केंद्रीय अधिनियमांचे व अध्यादेशांचे अनुकूलन) आदेश, १९४८.

१२. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

१३. विविध अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६.

१४. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९६२ (१९६२ चा ३१).

१५. भूमिसंपादन (विशोधन व विधिग्राह्यता) अधिनियम, १९६७ (१९६७ चा १३).

१६. भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९८४ (१९८४ चा ६८).

---

## महाराष्ट्र सुधारणा अधिनियम

१. भूमिसंपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३८ (१९३८ चा १८).

२. भूमिसंपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४५ (१९४५ चा २०).

३. भूमिसंपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५० (१९५० चा २७).

४. भूमिसंपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५३ (१९५३ चा ३५).

५. भूमिसंपादन (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९५७ (१९५८ चा १२).

६. भूमिसंपादन (महाराष्ट्र विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४ (१९६४ चा ३८).

७. भूमिसंपादन (महाराष्ट्र दुरुस्ती आणि भूमिसंपादनाच्या विवक्षित कार्यवाहीचे विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९६५ (१९६५ चा २४).

८. भूमिसंपादन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ३९).

९. भूमिसंपादन (महाराष्ट्र सुधारणा) आणि महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (सुधारणा) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४२).

१०. भूमिसंपादक (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७६ (१९७७ चा २९).

# भूमिसंपादन अधिनियम, १८९४

## कलमांचा क्रम

### भाग १ ला

कलमे

प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. [निरसित.]

३. व्याख्या.


### भाग १ ला-क

प्रारंभिक सर्वेक्षण


३क. जमिनींचे प्रारंभिक सर्वेक्षण व अधिकाऱ्यांच्या सर्वेक्षण करण्याच्या शक्ती.

३ख. नुकसानीबद्दल पैसे देणे.


### भाग २ रा

संपादन

प्रारंभिक अन्वेषण


४. प्रारंभिक अधिसूचना प्रकाशित करणे आणि त्यानंतरच्या अधिकाऱ्यांच्या शक्ती.

४. प्रारंभिक नोटिसीचे प्रकाशन आणि तद्नंतरच्या अधिकाऱ्यांच्या शक्ती.

५. नुकसानीबद्दल पैसे देणे.


आक्षेप


५क. आक्षेपांची सुनावणी.


संकल्पित संपादनाची घोषणा करणे


६. भूमी सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे असे घोषित करणे.

७. घोषणेनंतर जिल्हाधिकाऱ्याने संपादनासाठी उपाययोजना करणे.]

८. भूमी सीमांकित करणे, तिचे मापन करणे, आणि आराखडा तयार करणे.

९. हितसंबंधित व्यक्तींना नोटीस देणे.

१०. नावे आणि हितसंबंध यासंबंधी निवेदन करण्यास फर्मावण्याची व भाग पाडण्याची शक्ती.


जिल्हधिकाऱ्याने मापने, मूल्य आणि मागण्या यांबाबत चौकशी करणे व निवाडा देणे


११. जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी व निवाडा.]

११ क. किती कालावधीच्या आत निवडा द्यावा लागेल.

१२. जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा केव्हा अंतिम व्हावयाचा.]

१२ क. निवाड्यांचे विशोधन.

१३. चौकशी तहकूब करणे.

१३ क. हस्तदोष इ. दुरुस्त करणे.

१४. साक्षीदारांना समन्स पाठवून उपस्थित राहण्यास आणि दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्याची शक्ती.

१५. विचारात घेण्यायोग्य आणि विचारात न घेण्यायोग्य बाबी.

१५ क. अभिलेख इ. ची मागणी करण्याची शक्ती.

१५ क. कार्यवाहीचा अभिलेख मागवून घेण्याची व त्यावर आदेश देण्याची राज्य शासनाची शक्ती.


कब्जा घेणे


१६. कब्जा घेण्याची शक्ती.

१७. निकडीच्या प्रकरणी विशेष शक्ती.

## भाग ३ रा

### न्यायालयाकडे निर्देशन व त्यानंतरची कार्यपद्धती

कलमे

१८. न्यायालयाकडे निर्देशन.

१९. जिल्हाधिकाऱ्याचे न्यायालयाला निवेदन.

२०. नोटिशीची बजावणी.

२१. कार्यवाहीच्या व्याप्तीवरील मर्यादा.

२२. कार्यवाही खुल्या न्यायालयात करणे.

२३. भरपाई ठरवताना विचारात घ्यावयाच्या बाबी.

२४. भरपाई ठरवाताना विचारात न घ्यावयाच्या बाबी.

२५. न्यायालयाने निवाड्याद्वारे देववलेली भरपाईची रक्कम जिल्हाधिकाऱ्याने निवाड्याद्वारे देववलेल्या रकमेपेक्षा कमी नसावी.

२६. निवाड्यांचे प्ररूप.

२७. खर्च.

२८. जादा भरपाईच्या रकमेवर जिल्हाधिकाऱ्याने व्याज द्यावे असे निदेशित करता येईल.

२८ क. न्यायालयाच्या निवाड्यांच्या आधारे भरपाईच्या रकमेचे पुनर्निर्धारण करणे.

## भाग ४ था

### भरपाईचे संविभाजन

२९. संविभाजनाचा तपशील विनिर्दिष्ट करावयाचा.

३०. संविभाजनाबाबत तंटा.

## भाग ५ वा

### प्रदान

३१. भरपाई प्रदान करणे किंवा ती न्यायालयात जमा करणे.

३२. अन्यक्रामण करण्यास अक्षम असलेल्या व्यक्तींच्या भूमींबाबत जमा केलेल्या पैशाची गुंतवणूक.

३३. इतर प्रकरणी जमा केलेल्या पैशाची गुंतवणूक.

३४. व्याजाचे प्रदान.

## भाग ६ वा

### भूमीचा तात्पुरता ताबा

३५. पडीत किंवा कृषियोग्य भूमीचा तात्पुरता ताबा. भरपाईविषयक मतभेद अस्तित्वात असतील तेव्हा करावयाची कार्यवाही.

३६. प्रवेश करून कब्जा घेण्याची शक्ती आणि परत केल्यावर भरपाई देणे.

३७. भूमीच्या स्थितीविषयी मतभेद.

## भाग ७ वा

### कंपन्यांसाठी भूमिसंपादन

३८. (***)

३८ क. औद्योगिक संस्था ही विवक्षित प्रयोजनांपुरती कंपनी असल्याचे मानणे.

३९. समुचित शासनाची पूर्वसंमती आणि करारनाम्यांचे निष्पादन आवश्यक.

४०. पूर्वचौकशी.

४१. समुचित शासनाबरोबर करार.

४२. कारारनाम्याचे प्रकाशन.

४३. कंपन्यांसाठी भूमी पुरवण्यास शासन काराबद्ध असेल त्या बाबतीत कलमे ३९ ते ४२ लागू नाहीत.

४४. रेल्वे-कंपनीबरोबरचा करार कसा शाबीत करता येईल.

४४ क. हस्तांतरण इत्यादींवरील निर्बंध.

४४ ख. या भागान्वये शासकीय कंपन्यांहून अन्य खाजगी कंपन्यांसाठी, विशिष्ट प्रयोजने खेरीजकरून एरव्ही भूमी संपादित करावयाची नाही.

## भाग ८ वा

### संकीर्ण

**कलमे**

४५. नोटिशीची बजावणी.

४६. भूमिसंपादन करण्यास अटकाव करण्याबद्दल शास्ती.

४७. स्वाधीन करण्यास दंडाधिकाऱ्याने भाग पाडावयाचे.

४८. संपादन पूर्ण करण्याची सक्ती नाही; परंतु संपादन पूर्ण केले नसेल तेव्हा भरपाई द्यावयाची.

४९. घर किंवा इमारत यांच्या भागाचे संपादन.

५०. स्थानिक प्राधिकरण किंवा कंपनी यांच्या खर्चाने भूमिसंपादन.

५१. मुद्रांक शुल्क आणि फी यातून सूट.

५१ क. पुरावा म्हणून प्रमाणित प्रतीचा स्वीकार.

५२. अधिनियमाला अनुसरून केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दलच्या दाव्यांच्या बाबतीत नोटीस देणे.

५२ क. प्रत्यायोजन.

५३. न्यायालयापुढील कार्यवाहीस ' दिवाणी प्रक्रिया संहिता ' लागू असावयाची.

५४. न्यायालयापुढे कार्यवाहीतील अपिले.

५५. नियम करण्याची शक्ती.

# भूमिसंपादन अधिनियम, १८९४

## (१८९४ चा अधिनियम क्रमांक १)[1]

[१ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान]

[२ फेब्रुवारी १८९४]

**सार्वजनिक प्रयोजनांसाठी आणि कंपन्यांसाठी भूमीचे संपादन करण्यासंबंधीचा कायदा विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, सार्वजनिक प्रयोजनांसाठी आणि कंपन्यांसाठी आवश्यक असलेली भूमीसंपादन करण्या-संबंधीचा आणि अशा संपादनाबद्दल द्यावयाच्या भरपाईची रक्कम ठरवण्यासंबंधीचा कायदा विशोधित करणे समयोचित आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### भाग १ ला

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'भूमिसंपादन अधिनियम, १८९४' असे म्हणता येईल.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा :—

**गॅझेट ऑफ इंडिया,** १८९२, भाग पाच, पृष्ठ ३२ ;

प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा—**गॅझेट ऑफ इंडिया,** १८९४, भाग पाच, पृष्ठ २३ आणि कौन्सिलच्या कार्यवृत्ताकरिता पहा—**गॅझेट ऑफ इंडिया,** १८९२, भाग सहा, पृष्ठ २५ आणि **गॅझेट ऑफ इंडिया,** १८९४, पृष्ठे १९, २४ ते ४२.

हा अधिनियम—(१) संथाळ परगणा जमाबंदी विनियम, १८७२ (१८७२ चा ३)—कलम ३ याद्वारे संथाळ परगण्यामध्ये आणि (२) खोंडमाळ विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ४)—कलम ३ व अनुसूची याद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात आणि (३) अंगुल विधि विनियम, १९३६ (१९३६ चा ५)—कलम ३ व अनुसूची याद्वारे अंगुल जिल्ह्यात अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

तसेच हा अधिनियम 'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४) याखालील अधिसूचनेद्वारे (१) हजारी-बाग लोहरदाग (सध्याचा रांची जिल्हा, पहा **कलकत्ता राजपत्र,** १८९९, भाग एक, पृष्ठ ४४), आणि मानभूम या जिल्ह्यात आणि सिंगभूम जिल्ह्यातील धालभूम आणि कोल्हन या जिल्ह्यांत अंमलात असल्याचे घोषित करण्यात आले आहे. पहा—**गॅझेट ऑफ इंडिया,** १८९४, भाग एक, पृष्ठ ४०० आणि (२) पलामा जिल्ह्यात—**गॅझेट ऑफ इंडिया,** १८९४ भाग एक, पृष्ठ ६३९.

हा अधिनियम, १९५८ च्या मध्य प्रदेश अधिनियमाद्वारे संपूर्ण मध्य प्रदेशाला, १९६० चा विनियम ३, कलम ३ आणि अनुसूचीद्वारे नेफाला, १९६३ चा विनियम ६—कलम २ आणि अनुसूची १ली याद्वारे दादरा व नगरहवेली यांना, १९६३ चा विनियम ७—कलम ३ व अनुसूची १ली याद्वारे पाँडेचेरीला आणि १९६३ चा विनियम ११—कलम ३ व अनुसूचीद्वारे गोवा, दमण व दीवला आणि १९६५ चा विनियम ८—कलम ३ व अनुसूचीद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमीनदीवी या बेटांना लागू आहे.

हा अधिनियम पुढील ठिकाणी लागू करताना पुढीलप्रमाणे त्या त्या अधिनियमाद्वारे विशोधित करण्यात आला आहे :—

(एक) पश्चिम बंगाल—१९३४ चा बंगाल अधिनियम २ आणि १९४८ चा पश्चिम बंगाल अधिनियम ७.

(दोन) बिहार—बिहार अधिनियम, १९४६ चा ८, १९४८ चा २३, १९५१ चा १७, १९५१ चा ३५.

(तीन) मुंबई—मुंबई अधिनियम, १९३८ चा १८.

(चार) मध्य प्रदेश—मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम, १९३९ चा २७, १९४९ चा ७, १९४९ चा २८ आणि १९५० चा ३

(पाच) मद्रास—मद्रास अधिनियम, १९५० चा ३७ आणि १९५३ चा १२.

(सहा) ओरिसा—ओरिसा अधिनियम, १९४८ चा १९.

(सात) पंजाब—१९४८ चा पूर्व पंजाब अधिनियम १५.

(आठ) उत्तर प्रदेश—उत्तर प्रदेश अधिनियम, १९४५ चा १०, उत्तर प्रदेश अधिनियम, १९४८ चा १३ द्वारे पुन्हा अधिनियमित.

(नऊ) ओरिसा—१९४८ चा ओरिसा अधिनियम १९.

विशिष्ट नगरपालिका क्षेत्रांमध्ये भूमिसंपादनाचा उपबंध करण्यासाठी या अधिनियमात केलेल्या आपरिवर्तनांसाठी पहा—

(१) कलकत्ता सुधारणा अधिनियम, १९११ (१९११ चा बंगाल अधिनियम ५)—कलम ७१ व अनुसूची.

(२) कलकत्ता नगरपालिका अधिनियम, १९२३ (१९२३ चा बंगाल अधिनियम ३)—कलम ४७५.

(३) मुंबई शहर सुधारणा न्यास हस्तांतरण अधिनियम, १९२५ (१९२५ चा मुंबई अधिनियम १६).

(४) उत्तर प्रदेश नगर सुधारणा अधिनियम, १९१९ (१९१९ चा उत्तर प्रदेश अधिनियम ८)—कलम ५८ व अनुसूची.

(५) पंजाब नगर सुधारणा अधिनियम, १९२२ (१९२२ चा पंजाब अधिनियम ४)—कलम ५९ व अनुसूची.

(६) दरभंगा सुधारणा अधिनियम, १९३४ (१९३४ चा बी. अण्ड ओ. अधिनियम ४)—कलम ४१.

(७) मध्यप्रांत नगरपालिका अधिनियम, १९२२ (१९२२ चा मध्यप्रांत अधिनियम २)—कलम २३९ व अनुसूची.

(८) नागपूर सुधारणा न्यास अधिनियम, १९३६ (१९३६ चा मध्यप्रांत अधिनियम ३६)—कलम ६१ व अनुसूची.

(२) [१][जम्मू व काश्मीर राज्य] खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे ; आणि

(३) तो १ मार्च, १८९४ रोजी अंमलात येईल.

**(३) तो १ मार्च, १८९४ रोजी अंमलात येईल. [१][परंतु महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात, तो 'भूमिसंपादन (महाराष्ट्र विस्तार व दुरुस्ती) अधिनियम, १९६४ (१९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८) याचे कलम १, पोटकलम (३) अन्वये नेमण्यात आला असेल अशा दिवशी अंमलात येईल.]**

**२.** [निरसित] निरसन व विशोधन अधिनियम, १९१४ (१९१४ चा १०)—कलम ३ व अनुसूची २ री याद्वारे अंशत: आणि अंशत: निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १०)—कलम २ व अनुसूची याद्वारे निरसित.

**व्याख्या.** ३. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) "भूमि/भू/जमीन" या शब्दप्रयोगात, भूमीतून उद्भवणारे लाभ आणि भूसंलग्न असलेल्या किंवा भूसंलग्न अशा कोणत्याही गोष्टीशी कायमच्या जखडलेल्या वस्तू, यांचा समावेश आहे ;

[२][(कक) "स्थानिक प्राधिकरण" या शब्दप्रयोगात, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन केलेले नगर नियोजन प्राधिकरण (मग ते कोणत्याही नावाने संबोधले जावो) समाविष्ट आहे ;]

**[२][(कक) "कृषियोग्य जमीन" या शब्दप्रयोगाचा अर्थ, लागवडीस योग्य असलेली जमीन असा आहे, मग प्रत्यक्षात तिची लागवड केली जात असो वा नसो,—आणि त्यात उद्यान भूमीचाही समावेश आहे.]**

(ख) "हितसंबंधित व्यक्ती" या शब्दप्रयोगात, या अधिनियमाखालील भूमिसंपादनाबाबत द्यावयाच्या भरपाईमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश आहे ; आणि एखादी व्यक्ती ही भूमीवर परिणाम करणाऱ्या सुविधाधिकारात हितसंबंधित असल्यास ती व्यक्ती त्या भूमीमध्ये हितसंबंधित असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) "जिल्हाधिकारी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असा आहे, आणि त्यात जिल्हाधिकाऱ्याची या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्याकरिता [३][समुचित शासनाने] विशेषेकरून नियुक्त केलेला उपआयुक्त किंवा कोणताही अधिकारी यांचा समावेश आहे ;

[४][(गग) "राज्याच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखालील निगम" याचा अर्थ, केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये स्थापन केलेला कोणताही निगम-निकाय असा आहे, आणि या शब्दप्रयोगात 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार असलेली शासकीय कंपनी, 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याअन्वये किंवा राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही समनुरूप कायद्यान्वये नोंदणी केलेली, शासनाने स्थापन केलेली किंवा चालवलेली अशी एखादी सोसायटी आणि कोणत्याही राज्यात सहकारी संस्थांशी संबंधित असा जो कायदा त्या त्या काळी अंमलात असेल अशा कोणत्याही कायद्याच्या अर्थान्तर्गत असलेल्या ज्या सहकारी सोसायटीत केंद्र शासनाने किंवा एखाद्या राज्य शासनाने किंवा राज्य शासनांनी किंवा अंशत: केंद्र शासनाने आणि अंशत: एका किंवा अधिक राज्य शासनांनी भरणा केलेल्या भाग-भांडवलाची टक्केवारी कमीत कमी एकावन्न टक्के एवढी आहे अशी सहकारी सोसायटी यांचा समावेश आहे ;]

---

१. १९८४ चा अधिनियम ६८-कलम २ द्वारे "१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे भाग 'ख' राज्यांमध्ये समाविष्ट होती ती" या मजकुराऐवजी हा मजकूर घातला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे जादा दाखल केले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकारने" याऐवजी घातले.

४ १९८४ चा अधिनियम ६८—कलम ३ द्वारे कलम (ग) नंतर जादा दाखल केले.

**१ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८—कलम २ द्वारे घातले.**

**२ १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४—कलम २ द्वारे दाखल केले.**

(घ) "न्यायालय" या शब्दप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमाखालील न्यायालयाची कार्ये पार पाडण्याकरिता कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत एका विशेष न्यायिक अधिकाऱ्याची नियुक्ती [1][समुचित शासनाने] (तसे करण्याची शक्ती याद्वारे त्याला प्रदान करण्यात आल्यानुसार) केली नसेल तर, मूळ अधिकारिता असलेले प्रधान दिवाणी न्यायालय असा आहे;

**(घ) [1]["न्यायालय" या शब्दप्रयोगाचा अर्थ (कलम १८, पोटकलम (३) व्यतिरिक्त)], या अधिनियमाखालील न्यायालयाची कार्ये पार पाडण्याकरिता कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत एका विशेष न्यायिक अधिकाऱ्याची नियुक्ती समुचित शासनाने (तसे करण्याची शक्ती याद्वारे त्याला प्रदान करण्यात आल्यानुसार) केली नसेल तर, मूळ अधिकारिता असलेले प्रधान दिवाणी न्यायालय असा आहे. [2][आणि त्यामध्ये या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात, प्रमुख दिवाणी न्यायालय अशी कोणतीही कार्यवाही ज्याच्याकडे हस्तांतरित करील त्या, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयाचा समावेश होईल;]**

[2][(ङ) "कंपनी" या शब्दप्रयोगाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ३ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार असलेली, खंड (गग) मध्ये निर्देशिलेल्या शासकीय कंपनी व्यतिरिक्त इतर कंपनी;

(दोन) 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली किंवा एखाद्या राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही समनुरूप कायद्यान्वये नोंदणी केलेली, खंड (गग) मध्ये निर्देशिलेल्या सोसायटींव्यतिरिक्त इतर सोसायटी;

(तीन) कोणत्याही राज्यात सहकारी संस्थांशी संबंधित असा जो कायदा त्या त्या काळी अंमलात असेल अशा कोणत्याही कायद्याच्या अर्थान्तर्गत असलेली, खंड (गग) मध्ये निर्देशलेल्या सहकारी सोसायटींव्यतिरिक्त इतर सहकारी सोसायटी;]

[3][(ङङ) "समुचित शासन" या शब्दप्रयोगाचा अर्थ, संघराज्याच्या प्रयोजनांसाठी करावयाच्या भूमिसंपादनाच्या संबंधात, केंद्र शासन आणि अन्य कोणत्याही प्रयोजनांसाठी करावयाच्या भूमिसंपादनाच्या संबंधात, राज्य शासन असा आहे;]

**[3][(ङङङ) "भूमिसंपादन अधिकारी" म्हणजे राज्य शासनाकडून, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा या अधिनियमाच्या उपबंधांकरिता भूमिसंपादन अधिकारी म्हणून नेमण्यात येईल असा अधिकारी;]**

[4][(च) "सार्वजनिक प्रयोजन" या शब्दप्रयोगात पुढील प्रयोजनांचा समावेश आहे :—

(एक) गावठाणांची तरतूद अथवा विद्यमान गावठाणांचा विस्तार, नियोजित विकास किंवा सुधारणा;

(दोन) नगर नियोजनासाठी किंवा ग्राम नियोजनासाठी जमिनीची तरतूद;

(तीन) शासनाच्या कोणत्याही योजनेच्या किंवा धोरणाच्या अनुरोधाने शासकीय निधीतून जमिनीच्या योजनाबद्ध विकासासाठी जमिनीची तरतूद करणे ; आणि त्यानंतर, योजल्याप्रमाणे आणखी विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने भाडेपट्ट्याद्वारे, अभिहस्तांकनाद्वारे अथवा सरळ सरळ विक्री करून तिची संपूर्णतः किंवा अंशतः विल्हेवाट लावणे;

**(च) "सार्वजनिक प्रयोजन" या शब्दप्रयोगात [4][(१)] ज्या जिल्ह्यात शासनाने गावठाणांची तरतूद करण्याचा प्रघात आहे असे समुचित शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जाहीर केले असेल अशा जिल्ह्यामध्ये समुचित शासनाने अशी तरतूद करणे [1][आणि (२) क्षेत्रांचा विकास करण्याच्या प्रयोजनांसाठी सार्वजनिक महसुलातून किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील एखाद्या निधीमधून भूमीचे संपादन करणे आणि त्यानंतर, आणखी विकास करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ती भाडेपट्ट्याने देऊन, तिचे अभिहस्तांकन करून किंवा विक्री करून तिची संपूर्णतः किंवा अंशतः विल्हेवाट लावणे] याचा समावेश आहे; आणि**

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकारने" याऐवजी घातले.

२. सन १९८४ चा अधिनियम ६८—कलम ३ (ग) द्वारे मूळ खंडाऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे घातले.

४. सन १९८४ चा अधिनियम ६८—कलम ३ (घ) द्वारे मूळ खंडाऐवजी घातले.

**१. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८—कलम ३, पोटकलम (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.**

**२. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम २, पोटकलम (१) द्वारे दाखल केले.**

**३. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९—कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.**

**४. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम २ द्वारे घातले.**

(चार) राज्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील नियमाकरिता जमिनीची तरतूद करणे;

(पाच) गरीब किंवा भूमिहीन किंवा नैसर्गिक आपत्तींची झळ पोचलेल्या क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींना अथवा शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा राज्याच्या मालकीच्या अगर त्याच्या नियंत्रणाखालील निगमाने हाती घेतलेल्या कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीमुळे विस्थापित झालेल्या किंवा झळ पोचलेल्या व्यक्तींच्या निवासाच्या प्रयोजनासाठी जमिनीची तरतूद करणे ;

(सहा) शिक्षण, गृहनिर्माण, आरोग्य व झोपडपट्टी-निर्मूलन यासंबंधीची जी योजना शासनाद्वारे अथवा अशी कोणतीही योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाद्वारे अथवा समुचित शासनाच्या पूर्वसंमतीने स्थानिक प्राधिकरणाद्वारे किंवा 'सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली अगर राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही समनुरूप कायद्याखाली नोंदणी केलेल्या एखाद्या सोसायटीद्वारे अथवा राज्यात सहकारी सोसायट्यांशी संबंधित असा जो कायदा त्या त्या काळी अंमलात असेल अशा कोणत्याही कायद्याच्या अर्थान्तर्गत असलेल्या सहकारी सोसायटीद्वारे पुरस्कृत झालेली असेल अशी कोणतीही योजना कार्यान्वित करण्यासाठी जमिनीची तरतूद करणे;

(सात) शासनाने किंवा समुचित शासनाच्या पूर्वसंमतीने स्थानिक प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही इतर विकास योजनेसाठी जमिनीची तरतूद करणे ;

(आठ) अशासकीय कार्यालयासाठी कोणतीही जागा किंवा इमारत यांची तरतूद करणे ;

मात्र यामध्ये कंपन्यांकरता जमीन संपादन करणे या बाबीचा अंतर्भाव होत नाही;]

(छ) पुढील व्यक्ती यात यापुढे उपबंधित केल्यानुसार त्या त्या नात्याने व त्या त्या व्याप्तीपर्यंत "काम चालवण्यास हक्कदार" असलेल्या व्यक्ती मानण्यात येतील (म्हणजेच):—

लाभप्रद हितसंबंध असलेल्या इतर व्यक्तींचे विश्वस्त हे अशा कोणत्याही प्रकरणाच्या संदर्भात, आणि त्या लाभप्रद हितसंबंध असलेल्या व्यक्ती निःसमर्थ नसत्या तर ज्या व्याप्तीपर्यंत काम चालवू शकल्या असत्या त्या व्याप्तीपर्यंत काम चालविण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल;

ज्याला इंग्लिश कायदा लागू असेल अशा प्रकरणांमध्ये, विवाहित स्त्री तशी विवाहित स्त्री म्हणून आणि ती सज्ञान असो वा नसो, ती जणू काही अविवाहित व सज्ञान वयाची असावी त्याप्रमाणे तेवढ्या व्याप्तीपर्यंत काम चालवण्यास हक्कदार असलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल;

अज्ञान व्यक्तींचे पालक आणि वेड्या किंवा निर्बुद्ध व्यक्तींचे सुपूर्ददार किंवा व्यवस्थापक हे प्रत्येकी त्या नात्याने आणि खुद्द अज्ञान, वेड्या किंवा निर्बुद्ध व्यक्ती निःसमर्थ नसत्या तर, ज्या व्याप्तीपर्यंत काम चालवू शकल्या असत्या त्या व्याप्तीपर्यंत, काम चालवण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल :

परंतु,—

(एक) ज्या व्यक्तीचा विषयवस्तूमधील हितसंबंध हा, एरव्ही ती जिच्यासाठी कार्य करण्यास हक्कदार झाली असती अशा हितसंबंधित व्यक्तीच्या हितसंबंधास प्रतिकूल आहे असे, जिल्हाधिकारी किंवा न्यायालय यांची खात्री होईल अशाप्रकारे दाखवून देण्यात येईल अशी कोणतीही व्यक्ती "काम चालवण्यास हक्कदार" असल्याचे मानण्यात येणार नाही;

(दोन) अशा प्रत्येक प्रकरणात, हितसंबंधित व्यक्तीला वादमित्रामार्फत उपस्थित होता येईल किंवा, तिने वादमित्रामार्फत उपस्थित होण्यात कसूर केल्यास जिल्हाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायालय असे प्रकरण चालू असता त्या व्यक्तीच्या वतीने काम चालवण्यासाठी, त्या प्रकरणापुरता पालक नियुक्त करील;

(तीन) या अधिनियमाखालील कार्यवाहीमध्ये, वादमित्रामार्फत किंवा त्या प्रकरणापुरत्या पालकामार्फत, जिल्हाधिकारी किंवा न्यायालय यांच्यासमोर उपस्थित होणाऱ्या हितसंबंधित व्यक्तींच्या बाबतीत [1][ 'दिवाणी प्रक्रिया संहिता' १९०८ (१९०८ चा ५) पहिल्या अनुसूचीतील नियमावली ३२ वी ] याचे उपबंध, यथोचित परिवर्तनांसह लागू होतील; आणि

(चार) "काम चालवण्यास हक्कदार" असलेली कोणतीही व्यक्ती ती भूमी अन्यक्रामित करण्यास आणि स्वेच्छापूर्वक केलेल्या विक्रीतील खरेदी-रक्कम स्वीकारण्यास आणि त्याबाबत सुयोग्य विमुक्ती देण्यास सक्षम होऊ शकली असती असे नसल्यास, जिच्याकरिता काम चालवण्यास ती हक्कदार असेल अशा व्यक्तीला प्रदेय असलेली भरपाईची रक्कम स्वीकारण्यास सक्षम असणार नाही.

[1][ भाग १ ला—क

## प्रारंभिक सर्वेक्षण

**जमिनीचे प्रारंभिक सर्वेक्षण व अधिकाऱ्यांच्या सर्वेक्षण करण्याच्या शक्ती.**

३क. कोणत्याही स्थानिक भागातील जमीन एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा कसे अथवा ती आवश्यक ठरण्याची शक्यता आहे किंवा कसे हे ठरविणे प्रांतिक शासनाला शक्य व्हावे यासाठी, प्रांतिक शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्रांतिक शासनाने यासंबंधात सर्वसाधारणपणे किंवा विशेषकरून प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने आणि त्याचे नोकर व कामगार यांनी, पुढील गोष्टी करणे कायदेशीर होईल :—

(एक) अशा स्थानिक भागातील कोणत्याही भूमीवर प्रवेश करून तिचे सर्वेक्षण करणे आणि तिचे प्रतलमापन करणे;

(दोन) अशा प्रतलांवर खुणा करणे;

(तीन) भूमी अशा प्रयोजनास अनुकूल आहे किंवा कसे याची खात्री करून घेण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व कृती करणे, आणि

(चार) जेथे, अन्यथा, सर्वेक्षण पूर्ण करणे आणि प्रतलमापन करणे शक्य नसेल तेथे, कोणतेही उभे पीक, कुंपण किंवा जंगल याचा कोणताही भाग कापून टाकून साफ करणे :

परंतु कोणतीही व्यक्ती कोणत्याही इमारतीत किंवा राहत्या घरालगतच्या असलेल्या कोणत्याही बंदिस्त आवारात किंवा बागेत प्रवेश करण्याच्या आपल्या उद्देशाबद्दल अशा जागेच्या ताबाधारकाला किमान सात दिवसांची आगाऊ लेखी नोटीस दिल्याशिवाय प्रवेश करणार नाही. मात्र, तेथील ताबाधारकाची संमती असेल तर गोष्ट वेगळी.

**नुकसानीबद्दल पैसे देणे.**

३ख. प्रांतिक शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी किंवा याप्रमाणे प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, अशा प्रवेशाच्या वेळी, पूर्वोक्तप्रमाणे केल्या जाणाऱ्या सर्व आवश्यक त्या नुकसानीबद्दल रक्कम प्रदान करील किंवा देऊ करील, आणि याप्रमाणे प्रदान किंवा देऊ केलेल्या रकमेच्या पर्याप्ततेबद्दल वाद असल्यास, तो तत्काळ जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा जिल्ह्याच्या अन्य मुख्य महसूल अधिकाऱ्याकडे निर्णयासाठी निर्देशित करील, आणि असा निर्णय अंतिम असेल.]

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम ३(ङ) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

१. १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०—कलम २ द्वारे समाविष्ट केले.

## भाग २ रा

## संपादन

### प्रारंभिक अन्वेषण

प्रारंभिक अधिसूचना प्रकाशित करणे आणि त्यानंतरच्या अधिकाऱ्यांच्या शक्ती.

[1]४. (१) जेव्हा जेव्हा एखाद्या स्थानिक भागातील भूमीची एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी [2][किंवा एखाद्या कंपनीसाठी] [3][गरज आहे किंवा] गरज पडणे संभवनीय आहे असे [4][समुचित शासनाला] दिसून येईल तेव्हा, तशा आशयाची अधिसूचना शासकीय राजपत्रात [5][आणि त्या स्थानिक भागात खप असलेल्या दोन दैनिकांमध्ये—त्यांपैकी किमान एक स्थानिक भाषेतील असेल] प्रकाशित करण्यात येईल, आणि जिल्हाधिकारी अशा अधिसूचनेची सारांशरूप जाहीर नोटीस उक्त स्थानिक भागातील सोयीस्कर ठिकाणी [6][(अशा प्रकाशनाचा दिनांक व अशी जाहीर नोटीस दिल्याचा दिनांक यांपैकी जो शेवटचा दिनांक असेल त्यास यात यापुढे 'अधिसूचनेच्या प्रकाशनाचा दिनांक' म्हणून संबोधलेले आहे)] देण्याची तजवीज करील.

**४. (१) जेव्हा जेव्हा एखाद्या स्थानिक भागातील भूमीची एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा एखाद्या कंपनीसाठी गरज आहे किंवा गरज पडणे संभवनीय आहे असे समुचित शासनाला दिसून येईल तेव्हा, तशा आशयाची अधिसूचना [1][ शासकीय राजपत्रात किंवा 'लोकराज्य' नामक शासकीय नियतकालिकात किंवा त्या त्या स्थानिक क्षेत्रात खप असणाऱ्या एखाद्या वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात येईल ], आणि जिल्हाधिकारी अशा अधिसूचनेची सारांशरूप जाहीर नोटीस, उक्त स्थानिक भागातील सोयीस्कर ठिकाणी (अशा प्रकाशनाचा दिनांक व अशी जाहीर नोटीस दिल्याचा दिनांक यांपैकी जो शेवटचा दिनांक असेल त्यास यात यापुढे 'अधिसूचनेच्या प्रकाशनाचा दिनांक' म्हणून संबोधले आहे) देण्याची तजवीज करील.**

**प्रारंभिक अधिसूचना प्रकाशित करणे आणि त्यानंतरच्या अधिकाऱ्यांच्या शक्ती.**

(२) त्यानंतर अशा शासनाने यासंबंधात सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी आणि त्याचे नोकर व कामगार यांनी पुढील गोष्टी करणे कायदेशीर होईल,—

अशा स्थानिक भागातील कोणत्याही भूमीवर प्रवेश करून तिचे सर्वेक्षण करणे आणि तिचे प्रतलमापन करणे;

अंतर्मृदेमध्ये खणणे किंवा विधण करणे;

भूमी अशा प्रयोजनास अनुकूल झाली आहे किंवा काय याची खात्री करून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व कृती करणे;

जी भूमी घेण्याचे संकल्पित असेल तिच्या सीमा आणि त्यावर काही काम करावयाचे संकल्पित असल्यास अशा कामाची नियोजित दिशा आखणे;

खुणा लावून आणि चर खणून अशी प्रतले, अशा सीमा आणि अशा रेषा आखणे;

आणि, जेथे अन्यथा सर्वेक्षण पूर्ण करणे, आणि प्रतलमापन करणे, सीमा व रेषा आखणे शक्य नसते तेथे कोणतेही उभे पीक, कुंपण किंवा जंगल याचा कोणताही भाग कापणे व काढून टाकणे :

परंतु, कोणतीही व्यक्ती कोणत्याही इमारतीत किंवा राहत्या घराशी संलग्न असलेल्या कोणत्याही बंदिस्त आवारात किंवा बागेत प्रवेश करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल अशा ताबाधारकाला किमान सात दिवसांची आगाऊ लेखी नोटीस दिल्याशिवाय (मात्र तेथील ताबाधारकाची संमती असेल तर गोष्ट वेगळी) तसा प्रवेश करणार नाही.

---

१. जेव्हा एखाद्या कंपनीच्या प्रयोजनासाठी जमीन आवश्यक असेल तेव्हा, हे कलम ज्या विशोधनासहित वाचावे लागेल त्यासाठी 'प्राचीन स्मारकांचे जतन अधिनियम, १९०४' (१९०४ चा ७)—कलम ३८ (२) पहा.

एखाद्या संरक्षित स्मारकाचे जतन करणे म्हणजे या अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे "सार्वजनिक प्रयोजन" असावे त्याप्रमाणे ते स्मारक या अधिनियमाखाली संपादन करता येईल—'प्राचीन स्मारकांचे जतन अधिनियम, १९०४' (१९०४ चा ७)—कलम १० पहा.

२. १९८४ चा अधिनियम ६८—कलम ४(क्) द्वारे समाविष्ट केले.

३. १९२३ चा अधिनियम ३८—कलम २ द्वारे घातले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकारच्या' उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

५. १९८४ चा अधिनियम ६८—कलम ४(ख्) द्वारे समाविष्ट केले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ग्) द्वारे समाविष्ट केले.

**१. १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९—कलम २ द्वारे दाखल केले.**

५. याप्रमाणे प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी, अशा प्रवेशाच्या वेळी, पूर्वोक्ताप्रमाणे केल्या जाणाऱ्या सर्व आवश्यक त्या नुकसानाबद्दल रक्कम प्रदान करील किंवा देऊ करील, आणि याप्रमाणे प्रदान किंवा देऊ केलेल्या रकमेच्या पुरेसेपणाबाबत तंटा झाल्यास, तो तात्काळ जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा जिल्ह्याच्या अन्य मुख्य महसूल अधिकाऱ्याकडे तो तंटा त्याच्या निर्णयासाठी निर्देशित करील, आणि असा निर्णय अंतिम असेल. नुकसानीबद्दल पैसे देणे.

[1][आक्षेप

५क. (१) ज्या भूमीची सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा एखाद्या कंपनीसाठी गरज असल्याचे किंवा गरज पडण्याचा संभव असल्याचे कलम ४, पोटकलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे अशा कोणत्याही भूमीमध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीला [2][अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत], त्या भूमीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्या स्थानिक भागातील कोणत्याही भूमीच्या संपादनाविषयी आक्षेप घेता येईल. आक्षेपांची सुनावणी.

(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक आक्षेप जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी पाठवण्यात येईल, आणि जिल्हाधिकारी, आक्षेपकाला [4][स्वतः किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत] किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि असे सर्व आक्षेप ऐकल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटल्यास, तशी आणखी काही चौकशी केल्यानंतर तो [3][त्याने केलेल्या कार्यवाहीच्या अभिलेखासह आक्षेपांवरील त्याच्या शिफारशी अंतर्भूत असलेला, कलम ४, पोटकलम (१) खाली अधिसूचित केलेल्या भूमीबाबतचा अहवाल किंवा अशा भूमीच्या वेगवेगळ्या तुकड्यांबाबतचे वेगवेगळे अहवाल समुचित शासनाकडे त्या शासनाच्या निर्णयार्थ पाठवील.] आक्षेपांवरील [5][समुचित शासनाचा] निर्णय अंतिम असेल.

**(२) पोटकलम (१) खालील प्रत्येक आक्षेप [1][जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा कलम ४, पोटकलम (१) खालील अधिसूचना भूमिसंपादन अधिकाऱ्याने प्रसिद्ध केली असेल त्याबाबतीत, अशा भूमिसंपादन अधिकाऱ्याकडे लेखी] पाठवण्यात येईल, आणि [2][जिल्हाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, भूमिसंपादन अधिकारी] आक्षेपकाला स्वतः किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या व्यक्तींमार्फत किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल, आणि असे सर्व आक्षेप ऐकल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल, अशी आणखी चौकशी केल्यानंतर तो त्याने केलेल्या कार्यवाहीच्या अभिलेखासह आक्षेपांवरील त्याच्या शिफारशी अंतर्भूत असलेला, कलम ४, पोटकलम (१) खाली अधिसूचित केलेल्या भूमीबाबतचा अहवाल किंवा अशा भूमीच्या वेगवेगळ्या तुकड्यांबाबतचे वेगवेगळे अहवाल [3][समुचित शासनाकडे किंवा, प्रकरणपरत्वे, आयुक्ताकडे (राज्य शासनाने तसा निदेश दिला असेल तर, भूमिसंपादन अधिकाऱ्याचा तसा अहवाल किंवा तसे अहवाल राज्य शासनाकडे किंवा आयुक्ताकडे) राज्य शासनाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, आयुक्तांच्या निर्णयासाठी पाठवील.] आक्षेपांवरील समुचित शासनाचा निर्णय अंतिम असेल.**

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ जर या अधिनियमाखाली एखादी भूमी संपादन करण्यात आली असती तर जी व्यक्ती भरपाईमध्ये हितसंबंध असल्याचा दावा करण्यास हक्कदार होऊ शकली असती अशी व्यक्ती त्या भूमीमध्ये हितसंबंधित असल्याचे मानण्यात येईल.]

---

१. १९२३ चा अधिनियम ३८—कलम ३ द्वारे शीर्षक आणि कलम ५क घातले.
२. १९८४ चा अधिनियम ६८—कलम ५(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) द्वारे घातले.
४. १९६७ चा अधिनियम १३—कलम २ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.
**५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.**

**१. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९—कलम ४, पोटकलम (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**
**२. वरील अधिनियमाच्या कलम ४, पोटकलम (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**
**३. वरील अधिनियमाच्या कलम ४, पोटकलम (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**

भूमी सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे असे घोषित करणे.

६. (१) या अधिनियमाच्या ७ व्या भागाच्या उपबंधांच्या अधीनतेने [1][कलम ५क, पोटकलम (२) खाली कोणताही अहवाल देण्यात आला असल्यास तो विचारात घेतल्यानंतर, विशिष्ट भूमीची सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा एखाद्या कंपनीसाठी गरज आहे अशी [2][समुचित शासनाची] खात्री होईल तेव्हा,] अशा शासनाच्या सचिवाच्या किंवा शासनाचे आदेश प्रमाणित करण्यासाठी रीतसर प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या सहीनिशी तशा आशयाची घोषणा करण्यात येईल, [3][आणि कलम ५क, पोटकलम (२) खाली एक अहवाल देण्यात आलेला असो किंवा वेगवेगळे अहवाल देण्यात आलेले असोत—कलम ४, पोटकलम (१) खालील त्याच अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही भूमीच्या वेगवेगळ्या तुकड्यांच्या बाबतीत वेळोवेळी वेगवेगळ्या घोषणा करता येतील].

**६. (१) या अधिनियमाच्या ७ व्या भागाच्या उपबंधांच्या अधीनतेने कलम ५क, पोटकलम (२) अन्वये कोणताही अहवाल पाठवण्यात आला असल्यास, तो विचारात घेतल्यानंतर कोणतीही विशिष्ट भूमी एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा एखाद्या कंपनीसाठी आवश्यक आहे याबद्दल समुचित शासनाची खात्री होईल तेव्हा अशा शासनाच्या सचिवाच्या किंवा शासनाचे आदेश प्रमाणित करण्यासाठी रीतसर प्राधिकृत करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या सहीने [1][किंवा, प्रकरणपरत्वे, आयुक्ताच्या सहीने] तशा आशयाची घोषणा करण्यात येईल, आणि कलम ५क, पोटकलम (२) अन्वये एक अहवाल देण्यात आलेला असो किंवा वेगवेगळे अनेक अहवाल देण्यात आलेले असोत—कलम ४, पोटकलम (१) खालील त्याच अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही भूमीच्या वेगवेगळ्या तुकड्यांच्या बाबतीत वेळोवेळी वेगवेगळ्या घोषणा करता येतील.**

[4][परंतु कलम ४, पोटकलम (१) खालील अधिसूचनेत समाविष्ट केलेल्या कोणत्याही विशिष्ट जमिनीच्या बाबतीत करावयाची कोणतीही घोषणा ही जर अशी अधिसूचना—

(एक) 'भूमिसंपादन (विशोधन व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९६७' (१९६७ चा १) याच्या प्रारंभानंतर पण 'भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९८४' (१९८४ चा ६८) याच्या प्रारंभापूर्वी प्रकाशित झालेली असेल तर, अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून तीन वर्षे समाप्त झाल्यानंतर करण्यात येणार नाही; किंवा

(दोन) 'भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९८४' (१९८४ चा ६८) याच्या प्रारंभानंतर प्रकाशित झालेली असेल तर, अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून एक वर्ष समाप्त झाल्यानंतर करण्यात येणार नाही;]

[5][परंतु आणखी असे की], अशा संपत्तीबद्दल प्रदान करावयाची भरपाई कंपनीने, अथवा संपूर्णत: किंवा अंशत: शासकीय महसुलातून किंवा स्थानिक प्राधिकरणाद्वारे नियंत्रित किंवा व्यवस्थापित करण्यात येत असलेल्या एखाद्या निधीतून द्यावयाची नसेल तर अशी कोणतीही घोषणा करण्यात येणार नाही.

[6][**स्पष्टीकरण १.**—पहिल्या परंतुकामध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणताही कालावधी मोजताना कलम ४, पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेच्या अनुसार करावयाची कोणतीही कारवाई किंवा कार्यवाही न्यायालयाच्या आदेशाने काही काळ स्थगित झाल्यास तो कालावधी वगळण्यात येईल.

स्पष्टीकरण २.—जेथे अशा मालमत्तेबद्दल निवाड्याने द्यावयाच्या भरपाईची रक्कम राज्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील निगमाच्या निधीतून प्रदान करावयाची असते तेथे अशी भरपाई ही शासकीय महसुलातून द्यावयाची भरपाई असल्याचे समजण्यात येईल.]

**[2][स्पष्टीकरण.—अशा मालमत्तेसाठी द्यावयाची नुकसानभरपाई ही राज्याच्या मालकीचा किंवा राज्याचे नियंत्रण असलेला निगम असलेल्या कंपनीस, संपूर्ण नुकसानभरपाई किंवा तिचा कोणताही भाग देण्यासाठी राज्य शासनाने, कर्जाच्या, अनुदानाच्या किंवा अन्य कोणत्याही रूपाने, पुरविलेल्या कोणत्याही पैशातून दिली असेल किंवा द्यावयाची असेल, अशा**

---

१. १९२३ चा अधिनियम ३८–कलम ४ द्वारे घातले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

३. १९६७ चा अधिनियम, १३–कलम ३ द्वारे घातले.

४. १९८४ चा अधिनियम ६८–कलम ६ (क) (१) द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातला.

५. १९६७ चा अधिनियम १३–कलम ३ द्वारे "परंतु" या शब्दाऐवजी घातले.

६. १९८४ चा अधिनियम ६८–कलम ६ (क) (२) द्वारे घातले.

**१. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम ३९–कलम ९ (१) (क) अन्वये दाखल केले.**

**२. १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २४–कलम ३ द्वारे घातले.**

बाबतीत अशी नुकसानभरपाई ही सार्वजनिक महसुलातून दिलेली किंवा द्यावयाची असलेली नुकसानभरपाई असल्याचे समजण्यात येईल. ]

[1][(१क) या कलमाच्या पोटकलम (१) अन्वये किंवा 'भूमिसंपादन (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९६७' (१९६७ चा १३) याच्या कलम ४, पोटकलम (२) (ज्यांचा यात यापुढे संयुक्तपणे "उक्त उपबंध" असा निर्देश करण्यात आला आहे), यास अनुसरून कलम ४, पोटकलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या कोणत्याही जमिनीसंबंधातील घोषणा न्यायालयाच्या स्थगनादेशामुळे किंवा निषेधाज्ञेमुळे उक्त उपबंधांमध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी करता आली नसेल त्या बाबतीत, उक्त उपबंधांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, 'भूमिसंपादन (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७२' (१९७२ चा ३९) याच्या प्रारंभापासून एक वर्ष समाप्त होण्यापूर्वी, स्थगनादेश किंवा निषेधाज्ञा अंतिम रीत्या विलोपित करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा जमिनीच्या संबंधात या कलमान्वये घोषणा करता येईल; आणि शेवटी नमूद केलेल्या अधिनियमाच्या प्रारंभानंतर स्थगनादेश किंवा निषेधाज्ञा अंतिम रीत्या विलोपित करण्यात आली असेल त्या बाबतीत अशा विलोपनापासून एक वर्षाच्या आत या कलमान्वये अशा जमिनीसंबंधात घोषणा करता येईल. आणि उक्त उपबंधांमध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त होण्याची तारीख व अशा जमिनीच्या संपादनासाठी जिल्हाधिकाऱ्याकडून ठरविण्यात आलेली भरपाईची रक्कम देऊ केल्याची तारीख या दरम्यानच्या मुदतीसाठी, या अधिनियमान्वये निर्धारित केल्याप्रमाणे अशा जमिनीच्या बाजार मूल्यावर, दरसाल दरशेकडा सहा या दराने गणना करून, सरळ व्याज देण्यात येईल :

परंतु, न्यायालयाचा स्थगनादेश किंवा निषेधाज्ञा यामुळे ज्या मुदतीपर्यंत अशा जमिनीच्या संपादनाची कार्यवाही खोळंबून राहिली असेल त्या कोणत्याही मुदतीबद्दल, कोणतेही व्याज देय असणार नाही. ]

(२) [1][प्रत्येक घोषणा] शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येईल, [2][आणि अशी जमीन ज्या भागात असेल त्या स्थानिक भागात खप असलेल्या दोन दैनिकांमध्ये—त्यांपैकी किमान एकतरी स्थानिक भाषेतील असेल—प्रकाशित करण्यात येईल, आणि ज़िल्हाधिकारी अशा घोषणेची सारांशरूप जाहीर नोटीस उक्त स्थानिक भागातील सोयीस्कर ठिकाणी देण्याची तजवीज करील (अशा प्रकाशनाचा दिनांक व अशी जाहीर नोटीस दिल्याचा दिनांक यांपैकी जो शेवटचा दिनांक असेल त्यास यात यापुढे अधिसूचनेच्या प्रकाशनाचा दिनांक म्हणून संबोधले आहे) आणि अशा घोषणेमध्ये] ती भूमी जेथे आहे तो जिल्हा किंवा अन्य प्रादेशिक विभाग, ज्यासाठी तिची गरज आहे ते प्रयोजन, तिचे अंदाजित क्षेत्र आणि जेथे भूमीचा आराखडा तयार केला जाणार असेल तेथे असा आराखडा कोठे पाहावयास मिळेल ती जागा नमूद करण्यात येईल.

(२) प्रत्येक घोषणा [2][शासकीय राजपत्रात किंवा 'लोकराज्य' नामक शासकीय नियतकालिकात किंवा त्या त्या स्थानिक क्षेत्रात खप असणाऱ्या एखाद्या वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात येईल,] आणि जिल्हाधिकारी अशा घोषणेची सारांशरूप जाहीर नोटीस उक्त स्थानिक भागातील सोयीस्कर ठिकाणी देण्याची तजवीज करील (अशा प्रकाशनाचा दिनांक व अशी जाहीर नोटीस दिल्याचा दिनांक यांपैकी जो शेवटचा दिनांक असेल त्यास यात यापुढे अधिसूचनेच्या प्रकाशनाचा दिनांक म्हणून संबोधले आहे) आणि अशा घोषणेमध्ये ती भूमी जेथे आहे तो जिल्हा किंवा अन्य प्रादेशिक विभाग, ज्यासाठी तिची गरज आहे ते प्रयोजन, तिचे अंदाजित क्षेत्र आणि भूमीचा आराखडा तयार केला जाणार असेल तेथे असा आराखडा कोठे पाहावयास मिळेल ती जागा नमूद करण्यात येईल.

---

१. १९६७ चा अधिनियम १३—कलम ३ द्वारे "ती घोषणा" या शब्दांऐवजी घातले.

२. १९८४ चा अधिनियम ६८—कलम ६ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला.

१. १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम ३९—कलम ५ द्वारे घातले.

२. १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९—कलम ३ द्वारे दाखल केले.

(३) उक्त घोषणा म्हणजे सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा, प्रकरणपरत्वे, कंपनीसाठी भूमीची गरज आहे याचा निर्णायक पुरावा असेल; आणि अशी घोषणा केल्यानंतर [1][समुचित शासनास] यात यापुढे दिलेल्या पद्धतीने ती भूमी संपादन करता येईल.

घोषणेनंतर जिल्हाधिकाऱ्याने संपादनासाठी उपाययोजना करणे.

७. जेव्हा जेव्हा एखाद्या भूमीची सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा एखाद्या कंपनीसाठी गरज असल्याचे याप्रमाणे घोषित करण्यात आलेले असेल तेव्हा, [1][समुचित शासन] किंवा यासंबंधात [1][समुचित शासनाने] प्राधिकृत केलेला एखादा अधिकारी, भूमीच्या संपादनासाठी उपाययोजना करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यास निदेश देईल.

भूमी सीमांकित करणे, तिचे मापन करणे आणि आराखडा तयार करणे.

८. त्यानंतर, जिल्हाधिकारी, ती भूमी (कलम ४ खाली ती तत्पूर्वीच सीमांकित करण्यात आली नसेल तर) सीमांकित करवील, तसेच ती तिचे मापन करवील, आणि (तिचा आराखडा तयार करण्यात आला नसल्यास) तिचा आराखडा तयार करवील.

हितसंबंधित व्यक्तींना नोटीस देणे.

९. (१) यानंतर जिल्हाधिकारी या भूमीचा कब्जा घेण्याचा शासनाचा उद्देश आहे, आणि अशा भूमीमधील सर्व हितसंबंधांबद्दलच्या भरपाईच्या मागण्या त्याच्याकडे करण्यात याव्यात हे नमूद करणारी जाहीर नोटीस, भूमीवरील किंवा तिच्या नजीकच्या सोयीस्कर ठिकाणी लाववील.

(२) अशा नोटिशीमध्ये, याप्रमाणे आवश्यक असलेल्या भूमीचा तपशील नमूद करण्यात येईल, आणि भूमीमध्ये हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींना जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत, तीत निर्दिष्ट केलेल्या वेळी (अशी वेळ नोटिशीच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांपेक्षा आधीची असणार नाही), व स्थळी जिल्हाधिकाऱ्यापुढे उपस्थित होण्यास आणि भूमीतील त्यांच्या आपापल्या हितसंबंधाचे स्वरूप व अशा हितसंबंधांबद्दलच्या भरपाई-मागण्यांची रक्कम व तपशील आणि कलम ८ खाली केलेल्या मापनासंबंधी त्यांचे आक्षेप (काही असल्यास) निवेदन करण्यास त्या नोटिशीद्वारे आवश्यक करण्यात येईल. जिल्हाधिकारी, कोणत्याही प्रकरणी असे निवेदन लेखीरूपात करणे आणि पक्षकाराने किंवा त्याच्या अभिकर्त्याने त्यावर सही करणे आवश्यक करू शकेल.

(३) त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी, अशा भूमीच्या ताबाधारकावर (कोणी असल्यास) आणि तीमध्ये हितसंबंधित असल्याचे किंवा अशा हितसंबंधित व्यक्तींकरिता काम चालवण्यास हक्कदार असल्याचे ज्ञात असलेल्या किंवा तसा समजल्या गेलेल्या अशा ज्या व्यक्ती ती भूमी जेथे आहे त्या महसूल जिल्ह्यात राहात असतील किंवा अशा ज्या व्यक्तींचे त्यांच्या वतीने नोटिशीची बजावणी स्वीकारण्यास प्राधिकृत असे अभिकर्ते असतील त्या सर्व व्यक्तींवर त्याच आशयाची नोटीस बजावील.

(४) याप्रमाणे हितसंबंधित असलेली व्यक्ती इतरत्र राहत असून तिचा कोणीही अभिकर्ता नसेल तर, ती नोटीस त्या व्यक्तीचे ज्ञात असे लगतपूर्वीचे राहण्याचे ठिकाण, पत्ता किंवा कामधंद्याची जागा अशा पत्त्यावर तिला उद्देशून लिहिलेल्या आणि [2]['भारतीय डाक कार्यालय अधिनियम, १८९८' (१८९८ चा ६) याचे कलम २८ व २९ याखाली नोंदणी केलेल्या] पत्राद्वारे डाकेने तिच्याकडे पाठवण्यात येईल.

नावे आणि हितसंबंध यासंबंधी निवेदन करण्यास फर्मावण्याची व भाग पाडण्याची शक्ती.

१०. (१) त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी अशा कोणत्याही व्यक्तीला, त्या भूमीत किंवा तिच्या कोणत्याही भागात सहस्वामी, उपस्वामी, गहाणधारक किंवा कूळ म्हणून किंवा अन्यथा कोणताही हितसंबंध असलेल्या अन्य प्रत्येक व्यक्तीचे नाव, व्यवहार्य असेल तेथवर, ज्या निवेदनामध्ये अंतर्भूत आहे असे आणि अशा हितसंबंधाच्या स्वरूपाबाबतचे व निवेदनाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीची तीन वर्षे इतका काळ त्याच्यामुळे मिळालेले किंवा मिळण्याजोगे भाडे व फायदे (काही असल्यास) यांबाबतचे निवेदन निर्दिष्ट वेळी (अशी वेळ मागणीच्या दिनांकानंतरच्या पंधरा दिवसांच्या आधीची असणार नाही) व स्थळी आपणाकडे करण्यास किंवा सुपूर्द करण्यास फर्मावू शकेल.

(२) या कलमाखाली किंवा कलम ९ खाली जिने निवेदन करणे किंवा सुपूर्द करणे आवश्यक आहे अशी प्रत्येक व्यक्ती, तसे करण्यास 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)--कलमे १७५ व १७६ यांच्या अर्थानुसार विधितः बद्ध असल्याचे मानण्यात येईल.

### जिल्हाधिकाऱ्याने मापने, मूल्य आणि मागण्या यांबाबत चौकशी करणे व निवाडा देणे

जिल्हाधिकाऱ्याकडून चौकशी व निवाडा.

११. [3][(१)] याप्रमाणे निश्चित केलेल्या दिवशी किंवा चौकशी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात आली असेल अशा अन्य कोणत्याही दिवशी जिल्हाधिकारी कलम ८ खाली केलेल्या मापनासंबंधी, कलम ९ खाली दिलेल्या नोटिशीला अनुसरून कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने नमूद केलेले आक्षेप (काही असल्यास) आणि [4][कलम ४, पोटकलम (१) खाली अधिसूचना प्रकाशित केल्याच्या दिनांकास] असलेले भूमीचे मूल्य आणि भरपाई मागणाऱ्या त्या त्या व्यक्तींचे हितसंबंध यांबाबत चौकशी सुरू करील, आणि पुढील बाबतीत आपल्या सहीनिशी निवाडा देईल :--

(एक) भूमीचे खरे क्षेत्रफळ;

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

२. १९८४ चा अधिनियम ६८--कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या--कलम ८ द्वारे कलम ११ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

४. १९२३ चा अधिनियम ३८--कलम ५ द्वारे घातले.

(दोन) आपल्या मते भूमीबद्दल किती भरपाई-रक्कम मान्य करावी ते; आणि

(तीन) त्या भूमीमध्ये हितसंबंधित असल्याचे ज्ञात असलेल्या किंवा तसे समजल्या गेलेल्या अशा ज्या व्यक्तींविषयी किंवा अशा ज्या व्यक्तींच्या मागण्यांविषयी त्याला माहिती आहे त्या त्या व्यक्ती त्याच्यासमोर उपस्थित झालेल्या असोत किंवा नसोत---त्या सर्व व्यक्तींमध्ये उक्त भरपाई-रकमेचे संविभाजन :

[1][परंतु, समुचित शासनाच्या किंवा समुचित शासन यासंबंधात प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीशिवाय जिल्हाधिकारी या पोटकलमाखाली भरपाईचा निवाडा देणार नाही:

**[1][परंतु, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासन याबाबतीत नियुक्त करील अशा अधिकाऱ्याच्या पूर्वसंमतीशिवाय, जिल्हाधिकारी [2][राज्य शासन सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्दिष्ट करील अशा रकमेहून अधिक भरपाई देणारा कोणताही निवाडा] देणार नाही: ]**

परंतु आणखी असे की, यासंबंधात समुचित शासन विनिर्दिष्ट करील अशा वर्गातील प्रकरणी जिल्हाधिकाऱ्याने असा निवाडा द्यावा असे समुचित शासनाने निदेशित करणे हे कायदेशीर होईल.]

[1][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, जर कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला जिल्हाधिकाऱ्याची अशी खात्री पटली की, जमिनीत हितसंबंध असलेल्या ज्या व्यक्ती त्याच्यापुढे आलेल्या असतील अशा सर्व व्यक्तींचे समुचित शासनाने केलेल्या नियमावलीद्वारे विहित केलेल्या प्ररूपात जिल्हाधिकाऱ्याने द्यावयाच्या निवाड्यात अंतर्भूत करावयाच्या बाबीसंबंधी लेखी करार झाला आहे तर तो पुढे आणखी चौकशी न करता, अशा कराराच्या तरतुदींनुसार भरपाईचा निवाडा देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) खालील कोणत्याही जमिनीबद्दलच्या भरपाई-निर्धारणामुळे या अधिनियमाच्या इतर उपबंधानुसार त्याच स्थानिक भागातील किंवा इतरत्र असलेल्या इतर जमिनीबद्दलच्या भरपाई-निर्धारणावर त्याचा परिणाम होणार नाही.

(४) 'नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पोटकलम (२) खाली केलेला कोणताही करारनामा त्या अधिनियमाखाली नोंदणीस पात्र असणार नाही.]

[2][११क. घोषणेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत जिल्हाधिकारी कलम ११ खालील निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर भूमिसंपादनाबद्दलची संपूर्ण कार्यवाही व्यपगत होईल : **किती कालावधीच्या आत निवाडा द्यावा लागेल.**

परंतु, 'भूमिसंपादन (विशोधन) अधिनियम, १९८४' याच्या प्रारंभापूर्वी उक्त घोषणा प्रकाशित केली असेल त्या बाबतीत, अशा प्रारंभापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत निवाडा देण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**---या कलमात उल्लेखिलेला दोन वर्षांचा कालावधी मोजताना, उक्त घोषणेनुसार करावयाची कोणतीही कारवाई किंवा कार्यवाही न्यायालयाच्या आदेशाने काही काळ स्थगित झाल्यास तो कालावधी वगळण्यात येईल.]

१२. (१) असा निवाडा जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये दप्तरदाखल करण्यात येईल आणि यात यापुढे उपबंधित केले आहे तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत, जिल्हाधिकारी आणि हितसंबंधित व्यक्ती---मग त्या त्या व्यक्ती जिल्हाधिकाऱ्यापुढे उपस्थित झालेल्या असोत वा नसोत---यांच्या दरम्यान तो निवाडा म्हणजे भूमीचे खरे क्षेत्रफळ आणि तिचे मूल्य आणि हितसंबंधित व्यक्तींमध्ये भरपाईच्या रकमेचे संविभाजन याचा अंतिम व निर्णायक पुरावा असेल.

(२) निवाडा देण्यात आला त्यावेळी हितसंबंधित व्यक्तींपैकी ज्या व्यक्ती जातीने किंवा आपल्या प्रतिनिधींमार्फत उपस्थित नसतील त्यांना जिल्हाधिकारी निवाड्याची तात्काळ नोटीस देईल.

**१२. (१) असा निवाडा जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयामध्ये दाखल करण्यात येईल आणि [3][कलम १५क च्या उपबंधांच्या अधीनतेने आणि] यात यापुढे उपबंधित केले आहे त्या खेरीज इतर बाबतीत, जिल्हाधिकारी आणि हितसंबंधित व्यक्ती---मग संबंधित व्यक्ती जिल्हाधिकाऱ्यापुढे उपस्थित झालेल्या असोत वा नसोत---यांच्या दरम्यान तो निवाडा म्हणजे भूमीचे खरे क्षेत्रफळ आणि तिचे मूल्य आणि हितसंबंधित व्यक्तींमध्ये भरपाईच्या रकमेचे संविभाजन यांचा अंतिम व निर्णायक पुरावा असेल.** **जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा केव्हा अंतिम व्हावयाचा.**

**(२) निवाडा देण्यात आला [4][किंवा त्यात विशोधन करण्यात आले] त्यावेळी हितसंबंधित व्यक्तींपैकी ज्या व्यक्ती जातीने किंवा आपल्या प्रतिनिधींमार्फत उपस्थित नसतील त्यांना जिल्हाधिकारी आपल्या निवाड्याची [4][किंवा कलम १२क अन्वये त्यामध्ये करण्यात आलेल्या विशोधनाची] तात्काळ नोटीस देईल.**

---

१. १९८४ चा अधिनियम ६८-कलम ८ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे घातले.

**१. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५-कलम ३ द्वारे घातले.**

**२. १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२-कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**

**३. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५-कलम ४, पोटकलम (१) द्वारे समाविष्ट केले.**

**४. वरील अधिनियमाच्या-कलम ४, पोटकलम (२) द्वारे समाविष्ट केले.**

**निवाड्याचे विशोधन.** [1][१२क. (१) निवाड्यामधील कोणतीही लेखनविषयक किंवा आकडेमोडीतील चूक अथवा अभावित चूकभूलींमुळे उद्‌भवणाऱ्या चुका, जिल्हाधिकारी, निवाड्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त सहा महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, स्वतः होऊन किंवा हितसंबंधित व्यक्तीने अर्ज केल्यावरून, दुरुस्त करू शकले व अशा प्रकारे दुरुस्ती करण्यात आलेला निवाडा हा तद्‌नुसार विशोधित झाला असल्याचे मानण्यात येईल.

(२) अशा प्रकारे विशोधन केलेल्या निवाड्यावरून जर काही अतिप्रदान झाल्याचे उघडकीस आले तर, निवाड्याच्या विशोधनानंतर ताबडतोब किंवा निवाड्याच्या विशोधनावर न्यायालयाकडे निर्देश करण्यासाठी दिलेली मुदत संपल्यानंतर, जिल्हाधिकारी, ज्या व्यक्तीला अतिप्रदान करण्यात आले असेल त्या व्यक्तीला, अतिप्रदत्त रक्कम, नोटीस मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत राज्य शासनाला परत करण्यात आली नाही तर ती रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल. नोटीशीमध्ये नमूद केलेली मुदत संपल्यानंतर ती रक्कम अशा प्रकारे वसुलीयोग्य होईल अशी नोटीस देईल.]

**चौकशी तहकूब करणे.** १३. जिल्हाधिकाऱ्याला स्वतःस योग्य वाटेल अशा कोणत्याही कारणास्तव, वेळोवेळी तो निश्चित करील अशा दिवसापर्यंत चौकशी तहकूब करता येईल.

**हस्तदोष इ. दुरुस्त करणे.** [1][१३क. (१) जिल्हाधिकारी कोणत्याही वेळी पण उशिरात उशिरा निवाड्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपेपर्यंत किंवा कलम १८ खालील त्याने न्यायालयाकडे निर्देशन करणे आवश्यक असते त्या बाबतीत असे निर्देशन करण्यापूर्वी आदेशाद्वारे निवाड्यामधील कोणतेही हस्तदोष किंवा आकडेमोडीतील चुका अगर त्यांमध्ये झालेले प्रमाद स्वतःहून अथवा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तींच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अर्जावरून दुरुस्त करू शकेल :

परंतु, जेव्हा दुरुस्तीमुळे एखाद्या व्यक्तीवर बाधक परिणाम होण्याचा संभव असेल त्या बाबतीत अशा व्यक्तीला त्या बाबीसंबंधी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही दुरुस्ती केली जाणार नाही.

(२) निवाड्यामध्ये केलेल्या कोणत्याही दुरुस्तीसंबंधी जिल्हाधिकारी सर्व हितसंबंधित व्यक्तींना तात्काळ नोटीस देईल.

(३) कोणत्याही व्यक्तीला जादा रक्कम दिली गेली असे पोटकलम (१) खालील दुरुस्तीतून निष्पन्न झाल्यास अशी दिली गेलेली जादा रक्कम परतावापात्र असेल आणि अशी रक्कम परत करण्यात कसूर झाल्यास किंवा त्यास नकार देण्यात आल्यास ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.]

**साक्षीदारांना समन्स पाठवून उपस्थित राहण्यास आणि दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्याची शक्ती.** १४. या अधिनियमाखालील चौकशींच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकाऱ्याला, दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत [2]['दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५)] याखाली उपबंधित केल्याप्रमाणे त्याच मार्गांनी व (होईल तेथवर) त्याच पद्धतीने हितसंबंधित व्यक्ती किंवा त्यांच्यापैकी कोणीही यांसुद्धा, साक्षीदारांना समन्स पाठवून त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याची आणि दस्तऐवज हजर करण्याबाबत सक्ती करण्याची शक्ती असेल.

**विचारात घेण्यायोग्य आणि विचारात न घेण्यायोग्य बाबी.** १५. भरपाईची रक्कम ठरवताना, जिल्हाधिकाऱ्यास कलमे २३ व २४ मध्ये अंतर्भूत असलेले उपबंध मार्गदर्शक होतील.

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १० द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

१. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम ५ द्वारे समाविष्ट केले.

अभिलेख इ. ची मागणी करण्याची शक्ती.

[1][ १५ क. समुचित शासनाला कलम ११ खाली जिल्हाधिकाऱ्याने कोणताही निवाडा देण्यापूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही निष्कर्षाची किंवा काढलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता किंवा औचित्य याबाबत अथवा एखाद्या कार्यवाहीची नियमितता याबाबत स्वतःचे समाधान करून घेण्यासाठी अशा कार्यवाहीचा (मग ती चौकशीच्या रूपातील असो वा अन्य प्रकारची असो) अभिलेख मागवता येईल आणि त्यास त्या अनुषंगाने योग्य वाटेल त्यानुसार तसा आदेश काढता येईल किंवा तसा निदेश देता येईल:

कार्यवाहीचा अभिलेख मागवून घेण्याची व त्यावर आदेश देण्याची राज्य शासनाची शक्ती.

**[1][ १५क. कलम ११ अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून निवाडा दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, राज्य शासन, देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता किंवा औचित्य याबद्दल आणि अशा कार्यवाहीच्या नियमानुसारितेबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचा किंवा जिल्हाधिकाऱ्याने चालवलेल्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागवून घेऊ शकेल. जर एखाद्या प्रकरणात, अशाप्रकारे मागवण्यात आलेला कोणताही आदेश किंवा कार्यवाही आपरिवर्तित करणे, रद्दबातल करणे किंवा फिरवणे आवश्यक आहे असे राज्य शासनाला दिसून आले तर, ते त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल: ]**

परंतु, समुचित शासन जेणेकरून एखाद्या व्यक्तीवर बाधक परिणाम होईल असा कोणताही आदेश किंवा निदेश अशा व्यक्तीला तिचे स्वतःचे म्हणणे मांडण्यास वाजवी संधी दिल्याशिवाय काढणार नाही किंवा देणार नाही.].

## कब्जा घेणे

कब्जा घेण्याची शक्ती.

१६. जिल्हाधिकाऱ्याने कलम ११ खाली निवाडा केल्यानंतर तो भूमीचा कब्जा घेऊ शकेल व तदनंतर ती सर्व बोजांपासून मुक्त होऊन [2][[3][ शासनामध्ये ] निरपवादपणे निहित होईल.]

निकडीच्या प्रकरणी विशेष शक्ती.

१७. (१) निकडीच्या प्रकरणी, जेव्हा जेव्हा [4][ समुचित शासन ] तसे निदेशित करील तेव्हा, असा कोणताही निवाडा केला नसला तरीही, कलम ९, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीच्या प्रकाशनापासून पंधरा दिवस संपल्यावर जिल्हाधिकारी [5][ सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही भूमीचा कब्जा घेईल. ] तदनंतर, ती सर्व बोजांपासून मुक्त होऊन [2][[3][ शासनामध्ये ]] निरपवादपणे निहित होईल. ]

(२) कोणत्याही नाव्य नदीच्या पात्रामध्ये कोणताही आकस्मिक बदल झाल्यामुळे किंवा इतर अकल्पित आणीबाणीमुळे जेव्हा जेव्हा कोणत्याही रेल्वे प्रशासनास, आपली वाहतूक चालू ठेवण्यासाठी अथवा त्यावर नदीच्या काठावरील किंवा घाटावरील स्थानक बांधण्याच्या प्रयोजनासाठी अथवा अशा कोणत्याही स्थानकाशी संबंध जोडणारा सोईस्कर मार्ग किंवा तेथे जाण्याचा प्रवेशमार्ग उपलब्ध करण्यासाठी कोणत्याही भूमीचा तात्काळ कब्जा संपादन करणे आवश्यक होईल तेव्हा, [6][ अथवा समुचित शासनाला जलसिंचन, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्त्यांद्वारे दळणवळण, किंवा वीज यांच्याशी संबंधित कोणत्याही इमारतीची किंवा प्रणालीची देखभाल करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही जमिनीचा तात्काळ कब्जा घेणे आवश्यक वाटेल तेव्हा ], पोटकलम (१)

**१७. (१) निकडीच्या प्रकरणी, जेव्हा जेव्हा समुचित शासन तसे निदेशित करील तेव्हा, असा कोणताही निवाडा केला नसला तरीही, कलम ९, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीच्या प्रकाशनापासून पंधरा दिवस संपल्यावर, जिल्हाधिकारी, सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा कंपनीसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही [2][ * * * ] भूमीचा कब्जा घेईल. तदनंतर, ती सर्व बोजांपासून मुक्त अशी शासनाकडे निरपवादपणे निहित होईल.**

**(२) कोणत्याही नाव्य नदीच्या पात्रामध्ये कोणताही आकस्मिक बदल झाल्यामुळे किंवा इतर अकल्पित निकडीच्या परिस्थितीमुळे जेव्हा जेव्हा कोणत्याही रेल्वे प्रशासनास, आपली वाहतूक चालू ठेवण्यासाठी अथवा त्यावर नदीच्या काठावरील किंवा घाटावरील स्थानक बांधण्याच्या प्रयोजनासाठी अथवा अशा कोणत्याही स्थानकाशी संबंध जोडणारा सोईस्कर मार्ग किंवा तेथे जाण्याचा प्रवेशमार्ग उपलब्ध करण्यासाठी कोणत्याही भूमीचा तात्काळ कब्जा संपादन करणे आवश्यक होईल तेव्हा [3][ किंवा तशाच प्रकारच्या निकडीच्या परिस्थितीमुळे किंवा रस्ते, नद्या, नद्यांची पात्रे किंवा तलाव यांना हानी पोचवणाऱ्या फुटी किंवा इतर अकल्पित घटना यामुळे, रस्त्यावरून होणारे दळणवळण अबाधित राखण्यासाठी किंवा पाटबंधारे किंवा, प्रकरणपरत्वे,**

---

१. १९८४ चा अधिनियम ६८, कलम १२ द्वारे समाविष्ट केले.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "त्या शासनामध्ये निरपवादपणे निहित होईल" या शब्दांऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'क्राऊन' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

४. वरील आदेशाद्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

५. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १३ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

६. वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) द्वारे घातले.

**१. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम ६ द्वारे समाविष्ट केले.**

**२. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२—कलम २ द्वारे गाळले.**

**३. १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५,—कलम ७ द्वारे समाविष्ट केले.**

मध्ये निर्दिष्ट केलेली नोटीस प्रकाशित होताच तात्काळ आणि [३][समुचित शासनाच्या] पूर्वमंजुरीने जिल्हाधिकाऱ्याला अशा भूमीवर प्रवेश करुन तिचा कब्जा घेता येईल आणि तदनंतर ती सर्व बोजांपासून मुक्त होऊन [१][[२][शासनामध्ये] निरपवादपणे निहित होईल] :

पाणीपुरवठा सेवा चालू ठेवण्यासाठी राज्य शासनाने कोणत्याही भूमीचा तात्काळ कब्जा संपादन करणे आवश्यक होईल तेव्हा,] पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली नोटीस प्रकाशित होताच तात्काळ आणि समुचित शासनाच्या पूर्वमंजुरीने जिल्हाधिकाऱ्याला अशा भूमीवर प्रवेश करुन तिचा कब्जा घेता येईल, आणि तदनंतर ती सर्व बोजांपासून मुक्त अशी शासनाकडे निरपवादपणे निहित होईल :

परंतु जिल्हाधिकारी या पोटकलमाखाली, कोणत्याही इमारतीचा किंवा इमारतीच्या भागाचा कब्जा घेण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल ताबाधारकास किमान अठ्ठेचाळीस तासांची किंवा अशा ताबाधारकास अशा इमारतीतून आपली जंगम संपत्ती अनावश्यक गैरसोय न होता हलवणे शक्य व्हावे यासाठी वाजवीपणे पुरेशी होईल अशी त्याहून अधिक कालावधीची नोटीस दिल्याशिवाय, तसा कब्जा घेणार नाही.

(३) मागीलपैकी कोणत्याही पोटकलमाखाली प्रत्येक प्रकरणात जिल्हाधिकारी, कब्जा घेतेवेळी अशा भूमीवरील (असल्यास) कोणतीही उभी पिके आणि झाडे यांबद्दल आणि अशाप्रकरे आकस्मिकपणे कब्जा काढून घेतल्यामुळे त्यांना सोसाव्या लागलेल्या आणि कलम २४ मध्ये अपवाद न केलेल्या अन्य कोणत्याही नुकसानाबद्दल हितसंबंधित व्यक्तींना भरपाई देऊ करील, आणि अशी देऊ केलेली रक्कम स्वीकारण्यात न आल्यास, यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांखाली भूमीबद्दल भरपाई देववताना, अशी पिके आणि झाडे यांचे मूल्य आणि अशा इतर नुकसानीची रक्कम मान्य करण्यात येईल.

[१][(३क) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली कोणत्याही जमिनीचा कब्जा घेण्यापूर्वी जिल्हाधिकारी, पोटकलम (३) च्या उपबंधांना बाध न येऊ देता,—

(क) अशा जमिनीबद्दल त्याने अंदाजे ठरवलेल्या भरपाई रकमेच्या ऐंशी टक्के इतकी रक्कम, ज्या हितसंबंधित व्यक्ती त्या रकमेस हक्कदार असतील त्या व्यक्तींना देऊ करील, आणि

(ख) कलम ३१ च्या पोटकलम (२) मध्ये नमूद केलेल्या आकस्मिक कारणांपैकी एका किंवा अनेक कारणांमुळे त्याला आडकाठी झाली नाही तर, त्यांना ती रक्कम देईल.

आणि जिल्हाधिकाऱ्याला अशी आडकाठी आल्यास कलम ३१,पोटकलम (२) चे उपबंध (त्याचे दुसरे परंतुक सोडून) त्या कलमाखाली भरपाई देण्याबाबत जसे लागू होतात तसे ते या बाबतीत लागू होतील.

(३ख) पोटकलम (३क) खालील प्रदान केलेली किंवा जमा केलेली रक्कम, कलम ३१ खाली देऊ करणे आवश्यक असलेली भरपाईची रक्कम ठरवण्यासाठी हिशेबात घेण्यात येईल, आणि अशा तऱ्हेने प्रदान केलेली किंवा जमा केलेली रक्कम जिल्हाधिकाऱ्याने कलम ११ खाली निवाड्याने देववलेल्या भरपाईच्या रकमेपेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत, अशी अधिक रक्कम, जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत परत करण्यात आली नाही तर, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.]

[२][(४) ज्या भूमीला [३][समुचित शासनाच्या] मते पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) चे उपबंध लागू होतात अशा कोणत्याही भूमीच्या बाबतीत [३][समुचित शासन], कलम ५क चे उपबंध लागू होणार नाहीत असे निदेशित करु शकेल, आणि जर त्याने असे निदेशित केले तर, कलम ४,पोटकलम (१) खालील [४][अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकानंतर] कोणत्याही वेळी, त्या भूमीबाबत कलम ६ खाली घोषणा करता येईल.

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १३ (ग) द्वारे समाविष्ट केले.

२. १९२३ चा अधिनियम ३८—कलम ६ द्वारे घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

४. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १३ (घ) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

१. १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४—कलम ४ द्वारे घातलेले स्पष्टीकरण १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२—कलम २ द्वारे गाळले.

## भाग ३ रा

## न्यायालयाकडे निर्देशन व त्यानंतरची कार्यपद्धती

न्यायालयाकडे निर्देशन.

१८. (१) जिने निवाडा स्वीकारलेला नाही अशा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीला जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून, ती बाब जिल्हाधिकाऱ्याने निर्णयासाठी न्यायालयाकडे निर्देशित करावी अशी मागणी करता येईल—मग तिचा आक्षेप भूमीच्या मापनासंबंधी असो, भरपाईच्या रकमेसंबंधी असो, ती ज्यांना प्रदेय आहे अशा व्यक्तींसंबंधी असो किंवा हितसंबंधित व्यक्तींमध्ये भरपाईच्या रकमेचे संविभाजन करण्यासंबंधी असो.

(२) ज्या कारणास्तव निवाड्याला आक्षेप घेण्यात आलेला आहे ती कारणे अर्जामध्ये नमूद करण्यात येतील, परंतु असा प्रत्येक अर्ज—

(क) तो करणारी व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याने त्याचा निवाडा दिला त्यावेळी त्याच्यासमोर उपस्थित राहिली असेल अथवा त्यावेळी त्याच्यासमोर तिचे प्रतिनिधित्व करण्यात आले असेल तर, जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या आत;

(ख) इतर बाबतीत, कलम १२, पोटकलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस मिळाल्यापासून सहा आठवडे किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या दिनांकापासून सहा महिने यांपैकी जो कालावधी प्रथम समाप्त होणारा असेल त्याच्या आत,

करावा लागेल.

१८. (१) जिने निवाडा[1] [किंवा त्याचे विशोधन] स्वीकारलेले नाही अशा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीला जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून, ती बाब जिल्हाधिकाऱ्याने निर्णयासाठी न्यायालयाकडे निर्देशित करावी अशी मागणी करता येईल—मग तिचा आक्षेप भूमीच्या मापनासंबंधी असो, भरपाईच्या रकमेसंबंधी असो, ती ज्यांना प्रदेय आहे अशा व्यक्तींसंबंधी असो, किंवा हितसंबंधित व्यक्तींमध्ये भरपाईच्या रकमेचे संविभाजन करण्यासंबंधी असो.

न्यायालयाकडे निर्देशन.

(२) ज्या कारणास्तव निवाड्याला [2][किंवा विशोधनाला] आक्षेप घेण्यात आलेला आहे ती कारणे अर्जामध्ये नमूद करण्यात येतील : परंतु, असा प्रत्येक अर्ज—

(क) तो करणारी व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याने त्याचा निवाडा [2][किंवा विशोधन] दिले त्यावेळी त्याच्यासमोर उपस्थित राहिली असेल अथवा त्यावेळी त्याच्यासमोर तिचे प्रतिनिधित्व करण्यात आले असेल तर, जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या [2][किंवा विशोधनाच्या] दिनांकापासून सहा आठवड्यांच्या आत;

(ख) इतर बाबतीत, कलम १२, पोटकलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस मिळाल्यापासून सहा आठवडे किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याच्या [2][किंवा विशोधनाच्या] दिनांकापासून सहा महिने यांपैकी जो कालावधी प्रथम समाप्त होणारा असेल त्याच्या आत,

करावा लागेल.

[3][(३) या कलमान्वये केलेल्या अर्जावर जिल्हाधिकाऱ्याने दिलेला कोणताही आदेश हा, जणू काही जिल्हाधिकारी म्हणजे 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याचे कलम ११५ याच्या अर्थांतर्गत उच्च न्यायालयास दुय्यम असलेले न्यायालयच असल्याप्रमाणे उच्च न्यायालयाकडून पुनरीक्षण केले जाण्यास अधीन असेल.]

जिल्हाधिकाऱ्याचे न्यायालयाला निवेदन.

१९. (१) निर्देशन करताना जिल्हाधिकारी, न्यायालयाच्या माहितीसाठी स्वाक्षरित लेखाद्वारे पुढील गोष्टी निवेदन करील :—

(क) भूमीवरील कोणतीही झाडे, इमारती किंवा उभी पिके यांच्या तपशीलासह, भूमीचे स्थितिस्थान आणि व्याप्ती;

(ख) अशा भूमीमध्ये ज्या व्यक्ती हितसंबंधित आहेत असे समजण्यास त्याला कारण आहे त्यांची नावे;

(ग) नुकसानाबद्दल निवाड्याने देववलेली आणि कलमे ५ व १७ किंवा त्यांपैकी कोणतेही कलम याखाली दिलेली किंवा देऊ केलेली रक्कम आणि कलम ११ खाली निवाड्याने देववलेली भरपाईची रक्कम; [1]* * *

[2][(गग) कलम १७ च्या पोटकलम (३क) खाली दिलेली किंवा जमा केलेली रक्कम; आणि]

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १४ (क) द्वारे वगळले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

१. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८—कलम ३, पोटकलम (ख) द्वारे दाखल करण्यात आले.

(घ) जर भरपाईच्या रकमेविषयी आक्षेप असेल तर, ज्या मुद्यांच्या आधारे भरपाईची रक्कम ठरवण्यात आली ते मुद्दे.

(२) उक्त निवेदनास त्या त्या हितसंबंधित व्यक्तींवर बजावलेल्या नोटीशींचा आणि त्यांनी लेखी स्वरूपात केलेल्या किंवा सुपूर्द केलेल्या निवेदनांचा तपशील देणारी अनुसूची जोडण्यात येईल.

नोटिशीची बजावणी.

२०. तदनंतर न्यायालय आक्षेपांवर निर्णय देण्याची कार्यवाही आपण केव्हा सुरू करणार तो दिवस विनिर्दिष्ट करणारी आणि त्या दिवशी न्यायालयात उपस्थित राहण्याबाबत निदेश देणारी नोटीस खालील व्यक्तींवर बजावील, त्या अशा :—

(क) अर्जदार;

(ख) आक्षेपामध्ये हितसंबंधित असलेल्यांपैकी ज्या व्यक्तींनी निवाड्याने देववण्यात आलेल्या भरपाईची रक्कम स्वीकारण्यास बिनतक्रार संमती दिली अशा व्यक्ती (कोणी असल्यास) खेरीज-करून तशा सर्व हितसंबंधित व्यक्ती; आणि

(ग) आक्षेप हा भूमीच्या क्षेत्रफळासंबंधी किंवा भरपाईच्या रकमेसंबंधी असल्यास, जिल्हाधिकारी.

कार्यवाहीच्या व्याप्तीवरील मर्यादा.

२१. अशा प्रत्येक कार्यवाहीतील चौकशीची व्याप्ती आक्षेपामुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या हितसंबंधांचा विचार करण्यापुरती मर्यादित राहील.

कार्यवाही खुल्या न्यायालयात करणे.

२२. अशी प्रत्येक कार्यवाही खुल्या न्यायालयात करण्यात येईल, आणि राज्यातील कोणत्याही दिवाणी न्यायालयात व्यवसाय करण्यास हक्कदार असलेल्या सर्व व्यक्ती, अशा कार्यवाहीमध्ये उपस्थित होऊन (प्रकरणपरत्वे) बाजू मांडण्यास व काम चालवण्यास हक्कदार असतील.

भरपाई ठरवताना विचारात घ्यावयाच्या बाबी.

२३. (१) या अधिनियमाखाली संपादन केलेल्या भूमीबद्दल निवाड्याने देववण्याच्या भरपाईची रक्कम ठरवताना न्यायालय पुढील गोष्टी विचारात घेईल :—

एक—[1][कलम ४, पोटकलम (१) खालील अधिसूचना] प्रकाशित झाल्याच्या दिनांकास असलेले भूमीचे बाजारमूल्य;

दोन—जिल्हाधिकाऱ्याने तिचा कब्जा घेण्याच्या वेळी भूमीवर असलेली कोणतीही उभी पिके किंवा झाडे ताब्यात घेतल्यामुळे हितसंबंधित व्यक्तीला सोसावे लागलेले नुकसान;

तीन—जिल्हाधिकाऱ्याने भूमीचा कब्जा घेण्याच्या वेळी अशी भूमी त्याच्या इतर भूमीपासून वेगळी करण्याने हितसंबंधित व्यक्तीला सोसावे लागलेले नुकसान (काही असल्यास);

चार—जिल्हाधिकाऱ्याने भूमीचा कब्जा घेण्याच्या वेळी संपादनामुळे त्याच्या इतर स्थावर किंवा जंगम संपत्तीवर अन्य कोणत्याही रीतीने किंवा त्याच्या कमाईवर बाधक परिणाम झाला या कारणाने हितसंबंधित व्यक्तीला सोसावे लागलेले नुकसान (काही असल्यास);

पाच—जिल्हाधिकाऱ्याने भूमीचे संपादन केल्यामुळे, परिणामी हितसंबंधित व्यक्तीला आपले राहण्याचे ठिकाण किंवा कामधंद्याची जागा बदलणे भाग पडले असेल तर, अशा बदलाच्या अनुषंगाने झालेला वाजवी खर्च (काही असल्यास);

सहा—कलम ६ खालील घोषणेच्या प्रकाशनाची वेळ आणि जिल्हाधिकाऱ्याने भूमीचा कब्जा घेतला ती वेळ या दरम्यान भूमीपासून होणाऱ्या फायद्यात घट झाल्याने खरोखरी उद्भवणारे असे नुकसान (काही असल्यास);

[2][(१क) वर उपबंधित केल्यानुसार जमिनीच्या बाजार मूल्याशिवाय आणखी, न्यायालय प्रत्येक प्रकरणात, अशा बाजार मूल्यावर, अशा जमिनीच्या बाबतीत, कलम ४, पोटकलम (१) खालील अधि-सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकी व तेव्हापासून सुरू होणाऱ्या आणि जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याचा दिनांक व जमिनीचा कब्जा घेण्याचा दिनांक यांपैकी जो अगोदरचा असेल त्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी दरसाल बारा टक्के या दराने हिशेब करून काढलेली रक्कम निवाड्याने देववील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात निर्देशिलेला कालावधी मोजताना, जर कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाद्वारे मिळालेल्या स्थगितीमुळे किंवा व्यादेशामुळे जमिनीच्या संपादनाची कार्यवाही काही काळ रोखून धरलेली असेल, असा कालावधी किंवा असे कालावधी वगळण्यात येतील.]

(२) संपादन सक्तीच्या स्वरूपाचे आहे हे विचारात घेऊन न्यायालय प्रत्येक प्रकरणी, वर उपबंधित केल्याप्रमाणे भूमीच्या बाजारमूल्याच्या व्यतिरिक्त आणखी अशा बाजार मूल्यावर [3][तीस टक्के] एवढी रक्कम देववील.

---

१. १९२३ चा अधिनियम ३८–कलम ७ द्वारे "कलम ६ खालील त्यासंबंधीची घोषणा" या मजकुराऐवजी घातले.

२. १९८४ चा अधिनियम ६८–कलम १५(क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १५ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

२४. पण न्यायालय पुढील गोष्टी विचारात घेणार नाही :— भरपाई ठरवताना विचारात न घ्यावयाच्या बाबी.

एक—ज्यामुळे संपादन करावे लागले ती निकड कितपत होती;

दोन—संपादित भूमी सोडून देण्यास हितसंबंधित व्यक्तीची कोणत्याही प्रकारे नाखुषी;

तीन—तिला सोसाव्या लागलेल्या ज्या नुकसानाला खाजगी व्यक्ती कारणीभूत झाली असती तर, तशी व्यक्ती तिच्याविरुद्ध दावा लावला जाण्यास पात्र ठरली नसती ते नुकसान;

चार—कलम ६ खालील घोषणा प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर, संपादन करावयाच्या त्या भूमीचा जसा उपयोग केला जाईल त्यामुळे किंवा त्याचा परिणाम म्हणून तिला जे नुकसान पोचणे संभवनीय असेल असे कोणतेही नुकसान;

पाच—संपादनानंतर संपादित भूमीचा जसा उपयोग केला जाईल त्यातून जी उद्भवणे संभवनीय आहे अशी त्या भूमीच्या मूल्यातील कोणतीही वाढ;

सहा—संपादित भूमीचा जसा उपयोग केला जाईल त्यातून जी उद्भवणे संभवनीय आहे अशी हितसंबंधित व्यक्तीच्या अन्य भूमीच्या मूल्यातील कोणतीही वाढ; [1]* *

सात—[2][कलम ४, पोटकलम (१) खालील अधिसूचना] प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर संपादन करावयाच्या भूमीवर जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय आरंभलेला कोणताही खर्च किंवा केलेल्या कोणत्याही सुधारणा किंवा घडवून आणलेली कोणतीही विल्हेवाट; [3][किंवा

आठ—कायद्याने निषिद्ध ठरवलेल्या किंवा सार्वजनिक धोरणाविरुद्ध असलेल्या कोणत्याही उपयोगाकरता जमीन कामी लावल्यामुळे जमिनीच्या मूल्यात झालेली वाढ.]

[4][२५. न्यायालयाने निवाड्याद्वारे देववलेली भरपाईची रक्कम ही जिल्हाधिकाऱ्याने कलम ११ खाली निवाड्याद्वारे देववलेल्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.] न्यायालयाने निवाड्याद्वारे देववलेली भरपाईची रक्कम जिल्हाधिकाऱ्याने निवाड्याद्वारे देववलेल्या रकमेपेक्षा कमी नसावी.

२६. [5][(१)] या भागाखालील प्रत्येक निवाडा लेखी स्वरूपात व न्यायाधीशाच्या सहीचा असेल आणि त्यात कलम २३, पोटकलम (१) याच्या खंड एक खाली निवाड्याने देववलेली रक्कम, आणि तसेच, त्याच पोटकलमाच्या अन्य प्रत्येक खंडाखाली देववलेल्या त्या त्या रकमा (असल्यास) आणि सोबत उक्त रकमांपकी प्रत्येक रक्कम देववण्याची कारणे विनिर्दिष्ट करण्यात येतील. निवाड्यांचे प्ररुप.

[5][(२) असा प्रत्येक निवाडा म्हणजे हुकूमनामा होय आणि अशा प्रत्येक निवाड्याच्या कारणांचे निवेदन हा न्यायनिर्णय होय असे 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याचे अनुक्रमे कलम २, खंड (२) व कलम २, खंड (९) यांच्या अर्थानुसार मानले जाईल.]

२७. (१) अशा प्रत्येक निवाड्यामध्ये, या प्रकरणाखालील कार्यवाहीमध्ये झालेल्या खर्चाची रक्कम आणि ती कोणत्या व्यक्तींनी आणि किती प्रमाणामध्ये द्यावयाची आहे हेही नमूद करण्यात येईल. खर्च.

(२) जेव्हा जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा कायम करण्यात येणार नाही तेव्हा, अर्जदाराची मागणी इतकी अवास्तव होती किंवा त्याने जिल्हाधिकाऱ्यासमोर आपली बाजू मांडण्याच्या कामी इतकी हयगय केली की, त्याच्या खर्चातून काही वजात करण्यात यावी किंवा त्याने जिल्हाधिकाऱ्याच्या खर्चाचा काही भाग द्यावा असे न्यायालयाचे मत नसेल तर, खर्चाची रक्कम सर्वसाधारणपणे जिल्हाधिकाऱ्याला द्यावी लागेल.

**(२) जेव्हा जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा [1][किंवा त्याचे विशोधन] कायम करण्यात येणार नाही तेव्हा, अर्जदाराची मागणी इतकी अवास्तव होती किंवा त्याने जिल्हाधिकाऱ्यासमोर आपली बाजू मांडण्याच्या कामी इतकी हयगय केली की, त्याच्या खर्चातून काही वजात करण्यात यावी किंवा त्याने जिल्हाधिकाऱ्याच्या खर्चाचा काही भाग द्यावा असे न्यायालयाचे मत नसेल तर, खर्चाची रक्कम सर्वसामान्यपणे जिल्हाधिकाऱ्याला द्यावी लागेल.**

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १६(क) द्वारे वगळले.

२. १९२३ चा अधिनियम ३८—कलम ८ द्वारे "कलम ६ खालील घोषणा" या मजकुराऐवजी घातले.

३. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १६ (ख) द्वारे समाविष्ट केले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

५. १९२१ चा अधिनियम १९—कलम २ द्वारे कलम २६ याला 'कलम २६(१)' असा नवीन क्रमांक दिला आणि पोटकलम (२) घातले.

**१. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५-कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.**

जादा भरपाई-रकमेवर जिल्हाधिकाऱ्याने व्याज द्यावे असे निदेशित करता येईल.

२८. न्यायालयाच्या मते जिल्हाधिकाऱ्याने भरपाई म्हणून जी रक्कम निवाड्याद्वारे देववणे योग्य होते ती रक्कम जर जिल्हाधिकाऱ्याने भरपाई म्हणून देववलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर न्यायालय जिल्हाधिकाऱ्याने भूमीचा कब्जा घेतला त्या दिनांकापासून अशा अधिक रकमेचा न्यायालयामध्ये भरणा केला जाण्याच्या दिनांकापर्यंत [1][दरसाल दर शेकडा नऊ] या दराने अशा अधिक रकमेवर त्याने व्याज द्यावे असे निदेशित करू शकेल.

[2][परंतु, न्यायालयाच्या निवाड्यामध्ये असाही निदेश देता येईल की, जेथे अशी अधिक रक्कम किंवा तिचा कोणताही अंश कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्ति-दिनांकानंतर न्यायालयात भरला तर, अशा समाप्ति-दिनांकापूर्वी जी न्यायालयात भरणा केलेली नाही अशा अधिक रकमेवर किंवा अशा तिच्या अंशावर उक्त एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्ति-दिनांकापासून दरसाल दर शेकडा पंधरा या दराने व्याज प्रदेय असेल.]

न्यायालयाच्या निवाड्याच्या आधारे भरपाईच्या रकमेचे पुनर्निर्धारण करणे.

[3][२८क. (१) या भागाखालील निवाड्यात न्यायालयाने जर अर्जदाराला कलम ११ खाली, जिल्हाधिकाऱ्याकडून निवाड्याद्वारे देववण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक अशी भरपाईची कोणतीही रक्कम मंजूर केली तर कलम ४, पोटकलम (१) खालील त्याच अधिसूचनेत अंतर्भूत असलेल्या इतर सर्व जमिनींमध्ये हितसंबंधित असलेल्या ज्या व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्यामुळे नाराज झाल्या असतील त्या व्यक्तीसुद्धा, त्यांनी कलम १८ खाली जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केलेला नव्हता असे असले तरीही, न्यायालयाच्या निवाड्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्जाद्वारे अशी मागणी करू शकतील की, त्यांना प्रदेय असलेल्या भरपाईची रक्कम, न्यायालयाने निवाड्याद्वारे देववलेल्या भरपाई-रकमेच्या आधारे पुनर्निर्धारित करण्यात यावी :

परंतु, या पोटकलमाखाली जिल्हाधिकाऱ्याकडे ज्या कालावधीत अर्ज करावा लागेल तो तीन महिन्यांचा कालावधी मोजताना, निवाड्याची घोषणा केली तो दिवस व निवाड्याची प्रत मिळवण्यासाठी आवश्यक असणारा अवधी वगळण्यात येईल.

(२) जिल्हाधिकारी, पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर, सर्व हितसंबंधित व्यक्तींना नोटीस देऊन आणि त्यांना आपले म्हणणे मांडण्यास वाजवी संधी देऊन चौकशी चालवील आणि अर्जदारांना प्रदेय असलेल्या भरपाई-रकमेचे निर्धारण करणारा निवाडा देईल.

(३) ज्या कोणत्याही व्यक्तीने पोटकलम (२) खालील निवाडा स्वीकारलेला नसेल ती व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याला लेखी अर्जाद्वारे, ती बाब जिल्हाधिकाऱ्याने न्यायालयाच्या निर्णयार्थ निर्देशित करावी अशी मागणी करू शकेल आणि कलमे १८ ते २८ यांचे उपबंध जसे कलम १८ खालील निर्देशनाला लागू होतात तसे ते शक्य तेथवर अशा निर्देशनाला लागू होतील.]

## भाग ४ था

## भरपाईचे संविभाजन

संविभाजनाचा तपशील विनिर्दिष्ट करणे.

२९. जेथे अनेक व्यक्ती हितसंबंधित असतील तेथे, जर अशा व्यक्ती भरपाईच्या संविभाजनास कबूल असतील तर, अशा संविभाजनाचा तपशील निवाड्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल, आणि अशा व्यक्तींच्या दरम्यान निवाडा हा संविभाजनाच्या यथातथ्यतेचा निर्णायक पुरावा राहील.

संविभाजनाबाबत तंटा.

३०. जेव्हा कलम ११ खाली भरपाईची रक्कम निश्चित केलेली असेल तेव्हा जर, तिच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संविभाजनाविषयी किंवा ज्यांना ती भरपाईची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग प्रदेय आहे अशा व्यक्तींविषयी कोणताही तंटा उद्भवला तर, जिल्हाधिकाऱ्याला असा तंटा न्यायालयाच्या निर्णयार्थ निर्देशित करता येईल.

## भाग ५ वा

## प्रदान

भरपाई प्रदान करणे किंवा ती न्यायालयात जमा करणे.

३१. (१) कलम ११ खाली निवाडा केल्यानंतर, जिल्हाधिकारी त्याने निवाड्याने देववलेल्या भरपाईची रक्कम, निवाड्यानुसार ती मिळण्यास हक्कदार असलेल्या हितसंबंधित व्यक्तींना देऊ करील आणि पुढील पोटकलमामध्ये निर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक प्रसंगांमुळे प्रतिबंध न झाल्यास त्यांना तिचे प्रदान करील.

(२) जर ती स्वीकारण्यास त्यांनी संमती दिली नाही किंवा जर भूमी अन्यक्रामित करण्यास सक्षम अशी कोणतीही व्यक्ती नसेल, किंवा जर भरपाई स्वीकारण्याच्या हक्कासंबंधी अगर तिच्या संविभाजनासंबंधी कोणताही तंटा असेल तर, ज्याच्याकडे कलम १८ खाली निर्देशन सादर करण्यात येईल अशा न्यायालयात जिल्हाधिकारी भरपाईची रक्कम जमा करील :

परंतु, जी व्यक्ती हितसंबंधित असल्याचे मान्य झाले आहे अशा कोणत्याही व्यक्तीला रक्कम पुरेशी नाही असा निषेध नोंदवून असे प्रदान स्वीकारता येईल :

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम १८(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम १८ (ख) द्वारे समाविष्ट केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे नादा दाखल केले.

परंतु आणखी असे की, निषेध न नोंदवता अन्यथा जिने रक्कम स्वीकारली आहे अशी कोणतीही व्यक्ती, कलम १८ खाली कोणताही अर्ज करण्यास हक्कदार असणार नाही :

परंतु आणखी असे की, जी व्यक्ती या अधिनियमाखाली निवाड्याने देववण्यात आलेली कोणतीही संपूर्ण भरपाई किंवा तिचा कोणताही भाग स्वीकारील अशा कोणत्याही व्यक्तीवर त्या भरपाईस कायदेशीरपणे हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रदान करण्याच्या तिच्या दायित्वावर यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट परिणाम करणार नाही.

(३) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, कोणत्याही भूमीच्या बाबतीत संबंधित व्यक्तीचे हितसंबंध लक्षात घेता न्यायोचित होईल त्याप्रमाणे द्रव्यरूप भरपाई देववण्याऐवजी जिल्हाधिकाऱ्याला अशा भूमीमध्ये मर्यादित हितसंबंध असलेल्या व्यक्तीबरोबर त्या बदल्यात इतर भूमीचे अनुदान, त्याच हक्काअन्वये धारण केलेल्या इतर भूमीवरील जमीन-महसुलास माफी अशा किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणतीही व्यवस्था [1][ समुचित शासनाच्या ] मंजुरीने करता येईल.

(४) लगतपूर्व पोटकलमातील कोणतीही गोष्ट, भूमीमध्ये हितसंबंधित असलेल्या आणि तिच्याबाबत संविदा करण्यास [2] सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणतीही व्यवस्था करण्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तीच्या आड येते किंवा तिच्यावर मर्यादा घालते असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

**अन्यक्रामण करण्यास अक्षम असलेल्या व्यक्तींच्या भूमींबाबत जमा केलेल्या पैशाची गुंतवणूक.**

३२. (१) लगतपूर्व कलमाच्या पोटकलम (२) खाली जर कोणताही पैसा न्यायालयात जमा करण्यात आला आणि जिच्याबाबत ती रक्कम निवाड्याने देवविण्यात आली ती भूमी, तिचे अन्यक्रामण करण्याची शक्ती नसलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीची होती असे दिसून आले तर न्यायालय—

(क) जिच्याबाबत असा पैसा जमा करण्यात आलेला असेल ती भूमी जशी धारण केलेली होती तशासारखाच हक्क आणि मालकीच्या शर्ती याखाली धारण करावयाच्या इतर भूमीच्या खरेदीमध्ये; किंवा

(ख) जर अशी खरेदी तत्काळ करता येत नसेल तर, न्यायालयाला योग्य वाटेल अशा शासकीय किंवा इतर मान्य रोख्यांमध्ये;

तो पैसा गुंतवण्याचा आदेश देईल ; आणि अशा गुंतवणुकीतून उद्भवणाऱ्या व्याजाचे किंवा इतर उत्पन्नाचे प्रदान उक्त भूमीच्या कब्जाला त्या त्या काळी हक्कदार होण्यासारख्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना करण्याचा निदेश देईल आणि असा पैसा,—

(एक) पूर्वोक्त अशा इतर भूमींच्या खरेदीसाठी;

(दोन) त्यास अबाधितपणे हक्कदार होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना प्रदान करण्यासाठी, त्याचा विनियोग करण्यात येईपर्यंत अशाप्रकारे जमा आणि गुंतवलेला राहील.

(२) पैसे जमा केल्याच्या ज्या बाबतीत हे कलम लागू होते त्या सर्व बाबतीत, न्यायालय खालील बाबींचा सर्व खर्च, त्यातील सर्व वाजवी आकार आणि आनुषंगिक खर्च यांच्यासकट जिल्हाधिकाऱ्याने द्यावा असा आदेश देईल, त्या बाबी अशा :—

(क) पूर्वोक्त अशा गुंतवणुकीचा खर्च;

(ख) ज्यावर असे पैसे त्या त्या काळी गुंतवलेले असतील अशा रोख्यांचे व्याज किंवा इतर उत्पन्न यांच्या प्रदानासाठी आणि अशा पैशांच्या मुद्दलाचे न्यायालयाच्या मध्यस्थीशिवाय प्रदान करण्यासाठी काढावयाच्या आदेशांचा आणि परस्परविरुद्ध मागणीदारांमधील कोर्टकचेरीमुळे उद्भवलेला खर्च खेरीजकरून त्यासंबंधीच्या सर्व कार्यवाहींचा खर्च.

**इतर प्रकरणी जमा केलेल्या पैशाची गुंतवणूक.**

३३. जेव्हा कोणताही पैसा लगतपूर्व कलमामध्ये निर्दिष्ट केलेल्याहून अन्य कोणत्याही निमित्ताने या अधिनियमाखाली न्यायालयात जमा करण्यात आलेला असेल तेव्हा, कोणत्याही हितसंबंधित किंवा अशा पैशामध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या अर्जावरून न्यायालय, तो पैसा आपणांस योग्य वाटेल अशा शासकीय रोख्यांमध्ये किंवा इतर मान्य रोख्यांमध्ये गुंतवण्याचा आदेश देऊ शकेल आणि ज्या भूमीबाबत असा पैसा जमा करण्यात आलेला असेल तिच्यापासून हितसंबंधित व्यक्तींना जो लाभ मिळू शकला असता तोच लाभ किंवा शक्य तितका त्याच्या जवळपास असेल इतका लाभ त्यांना ज्याप्रकारे मिळेल असे त्यास वाटते त्याप्रकारे अशा कोणत्याही गुंतवणुकीचे व्याज किंवा इतर उत्पन्न संचित करून त्यांना देण्याचा निदेश देऊ शकेल.

**व्याजाचे प्रदान.**

३४. जेव्हा, भूमीचा कब्जा घेताच किंवा घेण्यापूर्वी, अशा भरपाईची रक्कम प्रदान किंवा जमा करण्यात येणार नाही तेव्हा, जिल्हाधिकारी निवाड्याने देववलेली रक्कम, याप्रमाणे कब्जा घेण्याच्या वेळेपासून ती रक्कम याप्रमाणे प्रदान किंवा जमा करण्यात येईपर्यंत तिच्यावर [3][ दरसाल दरशेकडा नऊ ] या दराने चढणाऱ्या व्याजासह प्रदान करील :

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतीय सरकार" च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

२. संविदा करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तींसंबंधी पहा, 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२' (१८७२ चा ९)—कलम ११.

३. १९८४ चा अधिनियम ६८—कलम २(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

[1][ परंतु, जर कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत अशी भरपाई-रक्कम किंवा तिचा काही अंश प्रदान केला नाही किंवा जमा केला नाही तर, अशा समाप्ति-दिनांकापूर्वी जी प्रदान केलेली नाही किंवा जमा केलेली नाही अशी भरपाई-रक्कम किंवा असा तिचा अंश यावर उक्त एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्ति-दिनांकापासून दरसाल दरशेकडा पंधरा या दराने व्याज प्रदेय असेल ].

## भाग ६ वा

## भूमीचा तात्पुरता ताबा

**पडीत किंवा कृषियोग्य भूमीचा तात्पुरता ताबा. भरपाईविषयक मतभेद अस्तित्वात असतील तेव्हा करावयाची कार्यवाही.**

३५. (१) या अधिनियमाचा भाग ७ वा याच्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा कंपनीसाठी एखाद्या पडीत किंवा कृषियोग्य भूमीचा तात्पुरता ताबा घेऊन वापर करणे आवश्यक आहे असे [2][समुचित शासनाला] जेव्हा जेव्हा वाटेल तेव्हा, तिचा ताबा घेऊन [2][समुचित शासनाला] योग्य वाटेल तितक्या व असा ताबा मिळाल्यापासून जास्तीत जास्त तीन वर्षे एवढ्या मुदतीपर्यंत वापर करण्याची तजवीज करण्याबाबत [2][समुचित शासन] जिल्हाधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल.

**[1][ (१क) पोटकलम (१) अन्वये निदेश देण्यापूर्वी, राज्य शासन, जिल्हाधिकाऱ्यास, पुढील गोष्टी सादर करण्यास फर्मावू शकेल :—**

**(क) ताबा घेऊन वापर करण्यासाठी आवश्यक असलेल्या भूमीचा आराखडा; आणि**

**(ख) पोटकलम (२) अन्वये प्रदेय होईल त्या भरपाईचा अंदाज;**

**आणि असे मागणीपत्र देण्यात आल्यावर, जिल्हाधिकारी, त्या मागणीपत्राच्या आशयाची जाहीर नोटीस ती भूमी जेथे असेल त्या स्थानिक भागातील सोईस्कर जागी लावण्याची व्यवस्था करील.**

**(१ख) अशी नोटीस लावल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याकडून या संबंधात सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्याचे नोकर व कामगार यांनी, कलम ४, पोटकलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्ती वापरणे कायदेशीर होईल.**

**(१ग) पोटकलम (१ख) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी भूमीवर प्रवेश करतेवेळी पूर्वोक्तप्रमाणे केल्या जाणाऱ्या सर्व आवश्यक त्या नुकसानीबद्दल रक्कम प्रदान करील किंवा देऊ करील आणि याप्रमाणे प्रदान किंवा देऊ केलेल्या रकमेच्या पुरेसेपणाबद्दल वाद असल्यास, तो अधिकारी तात्काळ तो वाद निर्णयासाठी, जिल्हाधिकाऱ्याकडे निर्देशित करील आणि असा निर्णय अंतिम असेल. ]**

(२) त्यानंतर जिल्हाधिकारी अशा भूमीतील हितसंबंधित व्यक्तींना, ज्या प्रयोजनासाठी ती आवश्यक आहे त्या प्रयोजनाची लेखी नोटीस देईल आणि पूर्वोक्त अशा मुदतीपुरता तिचा ताबा घेऊन वापर करण्याबद्दल आणि त्यातून घ्यावयाच्या अशा सामग्रीबद्दल (कोणतीही असल्यास) तो आणि अशांपैकी प्रत्येक व्यक्ती यांच्यामध्ये लेखी स्वरूपात संमत होईल अशी भरपाई त्यांना एकतर पैशांच्या ठोक रूपाने अथवा मासिक किंवा इतर नियतकालिक रकमेच्या प्रदानांच्या द्वारे देईल.

**(२) [2][पोटकलम (१) अन्वये निदेश देण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी] अशा भूमीतील हितसंबंधित व्यक्तींना, ज्या प्रयोजनासाठी ती आवश्यक आहे त्या प्रयोजनाची लेखी नोटीस देईल आणि पूर्वोक्त अशा मुदतीपुरता तिचा ताबा घेऊन वापर करण्याबद्दल आणि त्यातून घ्यावयाच्या अशा सामग्रीबद्दल (कोणतीही असल्यास) तो आणि अशांपैकी प्रत्येक व्यक्ती यांच्यामध्ये लेखी स्वरूपात संमत होईल अशी भरपाई त्यांना एकतर पैशांच्या ठोक रकमेच्या रूपाने अथवा मासिक किंवा इतर नियतकालिक प्रदानांच्या द्वारे देईल.**

---

१. सन १९८४ चा अधिनियम ६८—कलम २० (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

**१. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम १० द्वारे समाविष्ट केले.**

**२. वरील अधिनियमाच्या कलम १०, पोटकलम (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**

(३) जिल्हाधिकारी आणि हितसंबंधित व्यक्ती यांच्यामध्ये भरपाईच्या पुरेसेपणाबद्दल किंवा तिच्या संविभाजनाबाबत मतभेद झाला तर, जिल्हाधिकारी असा मतभेद न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करील.

३६. (१) कलम ३५ खाली अशी भरपाई प्रदान केल्यावर किंवा असा करार निष्पादित केल्यावर किंवा निर्देशन केल्यावर, जिल्हाधिकारी, भूमीवर प्रवेश करून तिचा कब्जा घेऊ शकेल आणि उक्त नोटिशीच्या उपबंधांनुसार तिचा वापर करू शकेल किंवा वापरास अनुज्ञा देऊ शकेल. प्रवेश करून कब्जा घेण्याची शक्ती आणि परत केल्यावर भरपाई देणे.

(२) मुदत समाप्त झाल्यावर, जिल्हाधिकारी भूमीस पोचलेले आणि ज्याविषयी कराराद्वारे उपबंध केलेले नाहीत असे जे नुकसान (काही असल्यास) असेल त्याबद्दल हितसंबंधित व्यक्तींना भरपाई देईल किंवा देऊ करील आणि ती भूमी त्यातील हितसंबंधित व्यक्तींना परत देईल :

परंतु, ती भूमी अशा मुदतीच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्यासाठी तिचा वापर केला जात होता त्या प्रयोजनासाठी वापर करण्यास कायमची अयोग्य झालेली असेल आणि हितसंबंधित व्यक्तींनी तशी मागणी केली असेल तर, [१][ समुचित शासन ] जणू काही सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा कंपनीसाठी ती भूमी कायमची आवश्यक असावी असे समजून त्याप्रमाणे या अधिनियमाखाली ती भूमी संपादन करण्याची कार्यवाही करील.

३७. मुदत संपतेवेळी भूमीची स्थिती कशी आहे यासंबंधी किंवा उक्त कराराशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी जिल्हाधिकारी आणि हितसंबंधित व्यक्ती यांच्यात मतभेद झाला तर, जिल्हाधिकारी असा मतभेद निर्णयासाठी न्यायालयाकडे निर्देशित करील. भूमीच्या स्थितीविषयी मतभेद.

## भाग ७ वा

## कंपन्यांसाठी भूमिसंपादन

[२]* * * *

[३][ ३८क. एखाद्या मानवी व्यक्तीची किंवा मानवी व्यक्तिसंघाची मालकी असलेल्या आणि कंपनीहून अन्य अशा ज्या औद्योगिक संस्थेत सर्वसामान्यपणे किमान शंभर एवढे कामगार कामाला लावलेले असतात त्या संस्थेत कामाला असलेल्या कामगारांना राहण्याकरिता घरे उभारण्यासाठी किंवा त्यांच्याशी प्रत्यक्षपणे निगडित असलेल्या सुखसोयी पुरवण्यासाठी भूमिसंपादन करू इच्छिणारी औद्योगिक संस्था ही, अशा भूमीच्या संपादनाचा संबंध पोचतो तेथवर, या भागाच्या प्रयोजनांपुरती कंपनी असल्याचे मानण्यात येईल आणि [४][ कलमे ४, ५क, ६, ७ व ५० ] यांत कंपनीचे जे उल्लेख असतील त्यांचा अर्थ अशा संस्थेचे उल्लेख म्हणून लावण्यात येईल. ] औद्योगिक संस्था ही विवक्षित प्रयोजनांपुरती कंपनी असल्याचे मानणे.

३९. [५][ या भागाखालील ] कोणत्याही कंपनीकरिता भूमिसंपादन करण्यासाठी [६][ कलमे ६ ते १६ (दोन्ही कलमे धरून) व कलमे १८ ते ३७ (दोन्ही कलमे धरून) ] यांचे उपबंध [१][ समुचित शासनाची ] पूर्वसंमती घेतलेली असल्याशिवाय, तसेच यात यापुढे निर्दिष्ट केल्याप्रमाणे कंपनीने करारनामा निष्पादित केल्याशिवाय, अंमलात आणले जाणार नाहीत. समुचित शासनाची पूर्वसंमती आणि करारनाम्याचे निष्पादन आवश्यक.

४०. (१) अशी संमती [७][ कलम ५क, पोटकलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावरून किंवा ] यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे केलेल्या चौकशीद्वारे पुढील गोष्टींबाबत [१][ समुचित शासनाची ] खात्री पटल्याशिवाय देण्यात येणार नाही :— पूर्वचौकशी.

[८][ (क) कंपनीत कामाला असलेल्या कामगारांना राहण्यासाठी घरे उभारण्याकरिता किंवा त्यांच्याशी प्रत्यक्षपणे निगडित असलेल्या सुखसोयी पुरवण्यासाठी भूमी प्राप्त करणे हे या भूमिसंपादनाचे प्रयोजन आहे, किंवा

[९][ (कक) जी कंपनी कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी असलेला कोणताही उद्योग किंवा काम करीत आहे किंवा करण्याच्या दृष्टीने पावले टाकीत आहे त्या कंपनीकरिता एखादी इमारत बांधण्यासाठी किंवा बांधकाम करण्यासाठी असे संपादन आवश्यक आहे; किंवा ]

(ख) असे संपादन एखादे बांधकाम करण्यासाठी आवश्यक आहे, आणि असे बांधकाम जनतेला उपयुक्त ठरण्याचा संभव आहे. ]

(२) अशी चौकशी [१][ समुचित शासन ] नियत करील अशा अधिकाऱ्याद्वारे आणि अशा वेळी आणि अशा जागी करण्यात येईल.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.
२. १९८४ चा अधिनियम ६८—कलम २१ द्वारे कलम ३८ वगळले.
३. १९३३ चा अधिनियम १६—कलम ६ द्वारे घातले.
४. १९८४ चा अधिनियम ६८—कलम २२ द्वारे, "कलमे ५अ, ६, ७, १७ आणि ५०" याऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या कलम २३ (ख) द्वारे समाविष्ट केला.
६. वरील अधिनियमाच्या कलम २३ (क) द्वारे "कलमे ६ ते ३७ (दोन्ही धरून)" या एवजी घातला.
७. १९२३ चा अधिनियम ३८—कलम ९ द्वारे घातले.
८. १९३३ चा अधिनियम १६—कलम ३ द्वारे मूळ खंड (क) व (ख) ऐवजी घातले.
९. १९६२ चा अधिनियम ३१—कलम ३ द्वारे घातले.

(३) असा अधिकारी दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत [१][दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५)] याद्वारे उपबंधित केल्याप्रमाणे त्याच मार्गांनी व शक्य तेथवर त्याच पद्धतीने साक्षीदारांना समन्स पाठवून उपस्थित राहण्यास भाग पाडू शकेल आणि दस्तऐवज हजर करण्याची सक्ती करू शकेल.

[२][समुचित शासनाबरोबर] करार.

४१. [३]* * * जर, [४][कलम ५क, पोटकलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याने दिलेला कोणताही अहवाल असल्यास, तो विचारात घेतल्यानंतर किंवा कलम ४० अन्वये चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अहवालावरून] [५][संकल्पित संपादन हे कलम ४०, पोटकलम (१) चा खंड (क) किंवा खंड (कक) किंवा खंड (ख) यामध्ये निर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी आहे] याबाबत, [२][समुचित शासनाची] खात्री झाली तर, [२][समुचित शासन][६] * * * कंपनीला, आपले समाधान होईल अशाप्रकारे पुढील बाबींसंबंधी उपबंध करणारा करार [७][[२][समुचित शासनाबरोबर]] करण्यास सांगू शकेल, त्या बाबी अशा :—

(१) संपादनाचा खर्च [८][[२][समुचित शासनाला] प्रदान करणे;]

(२) असे प्रदान केल्यावर कंपनीला भूमी हस्तांतरित करणे;

(३) ज्या अटींवर कंपनीला भूमी धारण करावी लागेल त्या अटी;

[९][(४) राहण्याची घरे उभारणे किंवा त्यांच्याशी निगडित अशा सुखसोयी पुरवणे या प्रयोजनांसाठी संपादन केलेले असेल तेव्हा, ज्या कालावधीत, ज्या शर्तींवर व ज्या पद्धतीने राहण्यासाठी घरे उभारण्यात येतील किंवा सुखसोयी पुरवण्यात येतील तो कालावधी, त्या शर्ती व ती पद्धती; [१०]* * *

[११][(४क) जी कंपनी कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठी असलेला असा उद्योग किंवा काम करते किंवा करण्याच्या दृष्टीने पावले टाकत आहे अशा कंपनीकरिता कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यासाठी संपादन केलेले असेल तेव्हा, ज्या कालावधीत व ज्या शर्तींवर इमारत बांधण्यात येईल किंवा बांधकाम पुरे करण्यात येईल तो कालावधी व त्या शर्ती; आणि]

(५) अन्य कोणतेही बांधकाम करण्यासाठी संपादन केलेले असेल तेव्हा, ज्या कालावधीत व ज्या शर्तींवर बांधकाम पुरे करण्यात येईल आणि त्याचे परिरक्षण करण्यात येईल तो कालावधी आणि त्या शर्ती आणि ज्या अटींवर जनतेला त्या बांधकामाचा उपयोग करण्याचा हक्क राहील त्या अटी.]

करारनाम्याचे प्रकाशन.

४२. असा प्रत्येक करारनामा, त्याचे निष्पादन झाल्यानंतर होईल तितक्या लवकर [१२]* * * **शासकीय राजपत्रात** प्रकाशित करण्यात येईल, आणि तदनंतर तो (ज्या अटींवर जनतेला त्या बांधकामाचा उपयोग करण्याचा हक्क राहील त्यांचा संबंध पोचतो तेथवर) जणू काही या अधिनियमाचा भाग असावा त्याप्रमाणे तसाच परिणामक होईल.

कंपन्यांसाठी भूमी पुरवण्यास शासन करारबद्ध असेल त्या बाबतीत कलमे ३९ ते ४२ लागू नाहीत.

४३. [१३][रेल्वे किंवा अन्य कंपनी यांच्याबरोबर झालेल्या कोणत्याही कराराखाली सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल, [१४][केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन]] अशा ज्या कंपनीच्या प्रयोजनांसाठी भूमी पुरवण्यास बांधलेले आहे किंवा होते त्या कंपनीसाठी करावयाच्या भूमिसंपादनास कलमे ३९ ते ४२ (दोन्ही कलमे धरून) यांचे उपबंध लागू असणार नाहीत, आणि [१५]'भूमिसंपादन अधिनियम, १८७०' (१८७० चा १०) याची तत्सम कलमे कधीही लागू नव्हती असे मानण्यात येईल.

रेल्वे-कंपनीबरोबरचा करार कसा शाबीत करता यईल.

४४. रेल्वे-कंपनीच्या प्रयोजनांसाठी करावयाच्या भूमिसंपादनाच्या बाबतीत, कलम ४३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा कराराचे अस्तित्व, त्याची जी मुद्रित प्रत शासनाच्या आदेशान्वये मुद्रित झाली असल्याचे दिसते अशी प्रत हजर करून शाबीत करता येईल.

---

१. १९८४ चा अधिनियम ६८—कलम २४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला.
२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.
३. १९२३ चा अधिनियम ३८—कलम १० द्वारे "असा अधिकारी, चौकशीतून काय निष्पन्न झाले ते स्थानिक सरकारला कळवील आणि" हे शब्द गाळले.
४. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे घातले.
५. १९६२ चा अधिनियम ३१—कलम ४ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी घातले.
६. १९२० चा अधिनियम ३८—कलम २ व अनुसूची १ ली, भाग १ ला याद्वारे "गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया इन कौन्सिल यासंबंधात वेळोवेळी विहित करील अशा नियमांच्या अधीनतेने" हे शब्द गाळले.
७. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल याच्याबरोबर" या शब्दांऐवजी घातले.
८. वरील आदेशाद्वारे "सरकारला प्रदान करणे" या शब्दांऐवजी घातले.
९. १९३३ चा अधिनियम १६—कलम ४ द्वारे मूळ खंड (४) व (५) ऐवजी घातले.
१०. १९६२ चा अधिनियम ३१—कलम ४ द्वारे "आणि" हा शब्द गाळला.
११. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे घातले.
१२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गॅझेट ऑफ इंडियामध्ये आणि तसेच" हे शब्द गाळले.
१३. वरील आदेशाद्वारे "रेल्वे किंवा अन्य कंपनी आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल यांच्यामध्ये झालेल्या कोणत्याही कराराखाली, सरकार" या मजकुराऐवजी घातले.
१४. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "किंवा ब्रिटिश भारतातील कोणतेही सरकार" या शब्दांऐवजी घातले.
१५. या अधिनियमाद्वारे निरसित.

[१][४४क. या भागाखाली ज्या कंपनीसाठी कोणतीही भूमी संपादन करण्यात आली आहे अशी कोणतीही कंपनी [२][समुचित शासनाची] पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय, उक्त भूमी किंवा तिचा कोणताही भाग यांचे विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा याद्वारे किंवा अन्यथा हस्तांतरण करण्यास हक्कदार असणार नाही. हस्तांतरण इत्यादींवरील निर्बंध.

४४ख. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ४०, पोटकलम (१), खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी असेल तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत शासकीय कंपनी नाही अशा खाजगी कंपनीसाठी कोणतीही भूमी या भागाखाली संपादित करण्यात येणार नाही. या भागान्वये शासकीय कंपन्यांहून अन्य खाजगी कंपन्यांसाठी, विशिष्ट प्रयोजने खेरीजकरून एरव्ही भूमी संपादित करावयाची नाही.

**स्पष्टीकरण.**—"खाजगी कंपनी" आणि "शासकीय कंपनी" यांना "कंपनी अधिनियम, १९५६" (१९५६ चा १) यामध्ये ठरवून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.]

## भाग ८ वा

## संकीर्ण

४५. (१) कलम ४ खालील नोटिशीच्या बाबतीत त्यात निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याने आणि अन्य कोणत्याही नोटिशीच्या बाबतीत, जिल्हाधिकारी किंवा न्यायाधीश यांनी किंवा त्यांच्या आदिष्टाने सही केलेली तिची प्रत सुपूर्द करून किंवा देऊ करून या अधिनियमाखालील कोणत्याही नोटिशीची बजावणी करण्यात येईल.

**४५. (१)[१][कलम ३ क किंवा ४ याखालील] नोटिशीच्या बाबतीत त्यात निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याने आणि अन्य कोणत्याही नोटिशीच्या बाबतीत, जिल्हाधिकारी किंवा न्यायाधीश यांनी किंवा त्यांच्या आदिष्टाने सही केलेली तिची प्रत सुपूर्द करून किंवा देऊ करून या अधिनियमाखालील कोणत्याही नोटिशीची बजावणी करण्यात येईल.** **नोटिशीची बजावणी.**

(२) जेव्हा जेव्हा व्यवहार्य असेल तेव्हा, नोटिशीची बजावणी तीत नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीवर करण्यात येईल.

(३) जेव्हा अशी व्यक्ती सापडत नसेल तेव्हा, तिच्या कुटुंबापैकी तिच्याबरोबर राहणाऱ्या कोणत्याही प्रौढ पुरुष व्यक्तीवर बजावणी करता येईल; आणि जर अशी कोणतीही प्रौढ पुरुष व्यक्ती सापडली नाही तर, नोटिशीत नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती सामान्यत: जेथे राहते किंवा कामधंदा चालवते त्या इमारतीच्या बाहेरील दारावर ती प्रत लावून अथवा पूर्वोक्त अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामधील किंवा न्यायालयाच्या इमारतीमधील कोणत्याही ठळक जागी आणि तसेच, संपादन करावयाच्या भूमीतील एखाद्या ठळक जागी नोटिशीची एखादी प्रत लावून तिची बजावणी करता येईल :

परंतु, जिल्हाधिकारी किंवा न्यायाधीश याने तसा निदेश दिल्यास ती नोटीस तीत नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला उद्देशून लिहिलेल्या आणि [३]['भारतीय डाक कार्यालय अधिनियम, १८९८,' (१८९८ चा ६) याची कलमे २८ व २९ या खाली नोंदणी केलेल्या] पत्राद्वारे डाकेने त्याच्या ज्ञात अशा लगतपूर्वीच्या राहण्याच्या ठिकाणी, पत्त्यावर किंवा कामधंद्याच्या जागी पाठवता येईल; आणि तिची बजावणी प्रेषितीची पावती हजर करून शाबीत करता येईल.

४६. जो कोणी कलम ४ किंवा कलम ८ द्वारे प्राधिकृत केलेल्यांपैकी कोणतीही कृती करत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला बुद्धिपुरस्सर अटकाव करील, अथवा कलम ४ खाली केलेला कोणताही चर किंवा खूण बुद्धिपुरस्सर भरून काढील, नष्ट करील, त्याला नुकसान पोचवील किंवा ती जागेवरून हलवील त्याची दंडाधिकाऱ्यापुढे दोषसिद्धी झाल्यास तो एक महिन्याहून अधिक नाही अशा कोणत्याही मुदतीच्या कारावासास, किंवा [४][पाचशे रुपयांहून] अधिक नाही एवढ्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**४६. जो कोणी [२][कलम ३क,] कलम ४ [३][कलम ८ किंवा कलम ३५ द्वारे] प्राधिकृत केलेल्यांपैकी कोणतीही कृती करत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला बुद्धिपुरस्सर अटकाव करील, अथवा [३][कलम ३क, कलम ४ किंवा कलम ३५] खाली केलेला कोणताही चर किंवा खूण बुद्धिपुरस्सर बुजवून टाकील, नष्ट करील, त्याला नुकसान पोचवील किंवा ती जागेवरून हलवील त्याची दंडाधिकाऱ्यापुढे दोषसिद्धी झाल्यास तो जास्तीत जास्त एक महिना मुदतीच्या कारावासास, किंवा जास्तीत जास्त पाचशे रुपयांच्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.** भूमिसंपादन करण्यास अटकाव करण्याबद्दल शास्ती.

---

१. १९६२ चा अधिनियम ३१—कलम ५ द्वारे कलमे ४४क व ४४ख ही समाविष्ट केली.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

३. १९८४ चा अधिनियम ६८—कलम २५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला.

**१. सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०—कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.**

**२. वरील अधिनियमाच्या कलम ४, पोटकलम (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.**

**३. सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५—कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.**

स्वाधीन करण्यास दंडाधिकाऱ्याने भाग पाडणे.

४७. जर या अधिनियमाखाली कोणत्याही भूमीचा कब्जा घेताना जिल्हाधिकाऱ्यास विरोध करण्यात आला किंवा प्रत्यवाय केला गेला तर, तो दंडाधिकारी असल्यास ती भूमी तो सक्तीने स्वतःच्या स्वाधीन करवून घेईल आणि तो दंडाधिकारी नसल्यास तो दंडाधिकाऱ्याकडे किंवा (कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या नगरांमध्ये) पोलीस आयुक्ताकडे अर्ज करील आणि (प्रकरणपरत्वे) असा दंडाधिकारी किंवा आयुक्त ती भूमी सक्तीने जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन करवील.

संपादन पूर्ण करण्याची सक्ती नाही, परंतु संपादन पूर्ण केले नसेल तेव्हा भरपाई देणे.

४८. (१) कलम ३६ मध्ये उपबंधित केलेली बाब खेरीजकरून कोणत्याही बाबतीत शासनास, जिचा कब्जा घेण्यात आलेला नाही त्या भूमीचे संपादन करण्यापासून माघार घेण्याची मोकळीक असेल.

(२) असे संपादन करण्यापासून शासन जेव्हा जेव्हा माघार घेईल तेव्हा, जिल्हाधिकारी नोटिशीचा किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा परिणाम म्हणून मालकाला सोसाव्या लागलेल्या नुकसानी-बद्दल देय असलेली भरपाईची रक्कम ठरवील आणि हितसंबंधित व्यक्तीला अशी रक्कम उक्त भूमीच्या संबंधात या अधिनियमाखालील कार्यवाही चालू असताना तिला वाजवीरीत्या आलेल्या सर्व खर्चासह प्रदान करील.

(३) या अधिनियमाचा भाग ३ रा याचे उपबंध या अधिनियमाखाली प्रदेय असलेली भरपाई ठरवण्याच्या बाबतीत होईल तेथवर लागू होतील

घर किंवा इमारत याच्या भागाचे संपादन.

४९. (१) जर एखादे संपूर्ण घर, कारखाना किंवा इमारत याचे संपादन करण्यात यावे अशी मालकाची इच्छा असेल तर, असे कोणतेही घर, कारखाना किंवा अन्य इमारत याचा फक्त एखादा भाग संपादन करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाच्या उपबंधांचा अंमल केला जाणार नाही :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने कलम ११ खाली आपला निवाडा देण्यापूर्वी मालकाला, असे संपूर्ण घर, कारखाना किंवा इमारत अशाप्रकारे संपादन करण्यात यावी अशी त्याने व्यक्त केलेली इच्छा लेखी नोटीशीद्वारे मागे घेता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल :

तसेच, या अधिनियमाखाली जी भूमी संपादित करावयाचे योजले आहे अशी कोणतीही भूमी, या कलमाच्या अर्थानुसार एखाद्या घराचा, कारखान्याचा किंवा इमारतीचा भाग आहे की नाही यासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, जिल्हाधिकारी असा प्रश्न न्यायालयाकडे निर्णयार्थ निर्देशित करील आणि या प्रश्नाचा निर्णय होऊन जाईपर्यंत तो अशा भूमीचा कब्जा घेणार नाही.

अशा निर्देशनावर निर्णय देताना न्यायालय, जी भूमी संपादन करावयाचे योजले आहे अशी भूमी ही घर, कारखाना किंवा इमारत यांचा पुरेपूर आणि अबाधित उपयोग करता यावा यासाठी आवश्यक आहे किंवा काय हा प्रश्न लक्षात घेईल.

(२) संपादन करावयाची भूमी हितसंबंधित व्यक्तीच्या अन्य भूमीपासून वेगळी झाल्याकारणाने तिने कलम २३, पोटकलम (१) तीन याखाली केलेल्या कोणत्याही मागणीच्या बाबतीत जर, ती मागणी गैरवाजवी किंवा बेसुमार आहे असे [१][समुचित शासनाचे] मत असेल तर, प्रथमतः संपादन करावयाचे ठरवलेली भूमी जिचा भाग होती अशी संपूर्ण भूमी संपादन करण्याबाबत ते जिल्हाधिकाऱ्याने निवाडा करण्यापूर्वी कोणत्याही वेळी आदेश देऊ शकेल.

(३) यात याच्या लगतपूर्वी उपबंधित केलेल्या बाबतीत कलमे ६ ते १०, दोन्ही कलमे धरून यांखाली नव्याने घोषणा किंवा अन्य कार्यवाही करण्याची आवश्यकता असणार नाही, पण जिल्हाधिकारी विनाविलंब [१][समुचित शासनाच्या] आदेशाची प्रत हितसंबंधित व्यक्तीला पुरवील, आणि त्यानंतर कलम ११ खाली आपला निवाडा देण्याच्या कामाला लागेल.

स्थानिक प्राधिकरण किंवा कंपनी यांच्या खर्चाने भूमिसंपादन.

५०. (१) एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून नियंत्रित किंवा व्यवस्थापित होणाऱ्या कोणत्याही निधीच्या किंवा कोणत्याही कंपनीच्या खर्चाने भूमि संपादन करण्यासाठी या अधिनियमाच्या उपबंधांचा अंमल केला जाईल तेव्हा, अशा संपादनाचा आणि तदनुषंगिक खर्च अशा निधीतून किंवा कंपनीकडून भागवण्यात येईल.

(२) अशा बाबतीत जिल्हाधिकारी किंवा न्यायालय यांच्यापुढे करण्यात येणाऱ्या कोणत्याही कार्य-वाहीत संबंधित स्थानिक प्राधिकरण किंवा कंपनी यांना उपस्थित होता येईल आणि भरपाईची रक्कम ठरवण्यासाठी पुरावा रुजू करता येईल :

परंतु, असे कोणतेही प्राधिकरण किंवा कंपनी कलम १८ खाली निर्देशनाची मागणी करण्यास हक्कदार असणार नाही.

मुद्रांक शुल्क आणि फी यांतून सूट.

५१. या अधिनियमाखाली केलेला कोणताही निवाडा किंवा करारनामा हा, मुद्रांक शुल्क आकारले जाण्यास पात्र असणार नाही, आणि असा कोणताही निवाडा किंवा करार याखाली हक्कमागणी सांगणारी कोणतीही व्यक्ती त्याच्या नकलेबद्दल कोणतीही फी देण्यास पात्र असणार नाही.

पुरावा म्हणून प्रमाणित प्रतीचा स्वीकार.

[२][५१क. या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत, 'नोंदणी अधिनियम, १९०८' (१९०८ चा १६) याखाली नोंदणी केलेली दस्तऐवजाची प्रमाणित प्रत, त्या अधिनियमाच्या कलम ५७ खाली दिलेल्या प्रतीसह अशा दस्तऐवजात नमूद केलेल्या संव्यवहाराचा पुरावा म्हणून स्वीकारता येईल.]

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतीय सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.
२. १९८४ चा अधिनियम ६८–कलम २७ द्वारे जादा दाखल केले.

५२. या अधिनियमाला अनुसरून केलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध जी कार्यवाही करणे उद्देशित असेल तिच्याबाबत व त्यामागील कारणांबाबत त्या व्यक्तीला एक महिन्याची आगाऊ लेखी नोटीस दिल्याशिवाय, तसेच पुरेसा प्रतितोष देऊ करण्यात आल्यानंतर कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही आरंभिली जाणार नाही किंवा चालवली जाणार नाही. अधिनियमाला अनुसरून केलेल्या कोणत्याही गोष्टींबद्दलच्या दाव्यांच्या बाबतीत नोटीस देणे.

[1][५२क. या अधिनियमाच्या पूर्ववर्ती उपबंधां-मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— प्रत्यायोजन.

(१) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये, शासनाला किंवा आयुक्ताला प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील असे कोणतेही निर्बंध किंवा शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने जिल्हाधिकाऱ्यास वापर करता येईल, तसेच त्यावर लादलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडता येतील.

(२) जिल्हाधिकाऱ्यास, शासनाच्या सर्व-साधारण अथवा विशेष आदेशांच्या अधीनतेने या अधिनियमाखालील आपल्या कोणत्याही शक्ती अथवा कामे, तहसीलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे अथवा याबाबतीत शासनाकडून विशेषरीत्या नेमण्यात येईल अशा भूमिसंपादन अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.]

५३. [2]['दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५)] याचे उपबंध या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींशी ते विसंगत असतील तेवढी मर्यादा वगळता न्यायालयापुढील या अधि-नियमाखालील सर्व कार्यवाहींना लागू होतील. न्यायालयापुढील कार्यवाहीस 'दिवाणी प्रक्रिया संहिता' लागू असणे.

[2][५४. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याचे जे उपबंध मूळ हुकूमनाम्या-वरील अपिलांना लागू आहेत त्यांच्या अधीनतेने आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमामध्ये विरुद्ध अशी कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये, न्यायालयाच्या निवाड्यावर किंवा निवाड्याच्या कोणत्याही भागावर फक्त उच्च न्यायालयात अपील होऊ शकेल आणि पूर्वोक्त अशा अपिलात उच्च न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यावर, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' कलम ११० आणि आदेश ४५ वा यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, [3][सर्वोच्च न्यायालयाकडे] अपील होऊ शकेल.] न्यायालयापुढील कार्यवाहीतील अपिले.

५५. (१) [4][समुचित शासनाला][5] * * * या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी निगडित असलेल्या सर्व बाबींमध्ये अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करण्याची शक्ती असेल, आणि अशाप्रकारे केलेल्या नियमांमध्ये त्यास वेळोवेळी फेरबदल करता येईल व भर घालता येईल : नियम करण्याची शक्ती.

---

१. सन १९८४ चा अधिनियम ६८—कलम २८ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले.

२. १९२१ चा अधिनियम १९—कलम ३ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टी इन कौन्सिलकडे" या शब्दांऐवजी घातले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक सरकार' च्या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

५. १९१४ चा अधिनियम ४—कलम २ व अनुसूची भाग १ ला याद्वारे घातलेले "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलच्या नियंत्रणाच्या अधीनतेने," हे शब्द १९२० चा अधिनियम ३८—कलम २ व अनुसूची १ ली, भाग १ ला याद्वारे गाळले.

१. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२—कलम ३ द्वारे घातले.

[1][परंतु, या अधिनियमाचा भाग ७ वा याची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याची शक्ती केंद्र शासनाला वापरता येईल आणि असे नियम, राज्य शासन आणि केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी करता येतील:

परंतु आणखी असे की, केंद्र शासनाने केलेला असा प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर लगेच संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि [2][पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी] जर, त्या नियमामध्ये कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही:]

[3][परंतु आणखी असे की, राज्य शासनाने केलेला असा प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

(२) पोटकलम (१) खाली नियम करणे, त्यात फेरबदल करणे किंवा जादा भर घालणे याबाबतच्या शक्ती, पूर्वप्रकाशनानंतर नियम करावयाचे, त्यांत फेरबदल करावयाचा किंवा भर घालावयाची या शर्तीच्या अधीन असतील.

(३) असे सर्व नियम, फेरबदल किंवा भर [4]* * * शासकीय राजपत्रात प्रकाशित करण्यात येतील, आणि तद्नंतर त्यांना कायद्याचे बळ प्राप्त होईल.

१. १९६२ चा अधिनियम ३१–कलम ६ द्वारे घातले. पूर्वी १९२० चा अधिनियम ३८–कलम २ व अनुसूची १ ली, भाग १ ला याद्वारे हे परंतुक घातले होते व अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे गाळले होते.

२. १९८४ चा अधिनियम ६८–कलम २९ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २९ (ख) द्वारे घातले.

४. १९१४ चा अधिनियम ४–कलम २ व अनुसूची भाग १ ला याद्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलने मंजर केल्यावर," हे शब्द गाळले.

# भूमिसंपादन अधिनियम, १८९४

# THE LAND ACQUISITION ACT, 1894

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंतर्मृदा | sub-soil | [क. ४ (२) ] |
| अन्यक्रामण करणे | alienate | [क. ३२ (१) ] |
| इमारत बांधणे | construction of building | [क. ४० (१) (कक) ] |
| उत्पन्न | proceeds | [क. ३२ (२) (ख) ] |
| उपस्थित राहण्यास भाग पाडणे | enforce the attendance | [क. १४] |
| औद्योगिक संस्था | industrial concern | [क. ३८क] |
| कंपनीकरिता बांधकाम करणे | work for a Company | [क. ४० (१) (कक) ] |
| करारनामा | agreement | [क. ३९] |
| काम चालवण्यास हक्कदार | entitled to act | [क. ३ (छ) ] |
| कार्यवाही चालू असताना | in prosecution of proceedings | [क. ४८ (२) ] |
| खर्च | 1. outlay | [क. २४ (सात) ] |
| | 2. costs | [क. २७-स.टी.] |
| खाजगी कंपनी | private company | [क. ४४ ख-स्पष्टी] |
| जमा करणे | deposit | [क. ३१-स.टी.] |
| जमीन | land | [क. ३ (क) ] |
| ताबा | occupation | [भाग सहा-शीर्षक] |
| ताबा घेणे व वापर करणे | occupation and use | [क. ३५ (१) ] |
| ताबाधारक | occupier | [क. ४-परंतुक] |
| नदीच्या काठावरील किंवा घाटावरील स्थानक. | river-side or ghat station | [क. १७ (२) ] |
| नाखुषी | disinclination | [क. २४ (दोन) ] |
| नाव्य नदी | navigable river | [क. १७ (२) ] |
| निकड | urgency | [क. २४ (एक) ] |
| निकडीचे प्रकरण | case of urgency | [क. १७-स.टी.] |
| निर्देशन | reference | [क. १८-स.टी.] |
| निवाडा | award | [क. ११ (१) ] |
| निवाड्याचे प्ररूप | form of award | [क. २६-स.टी.] |
| निवाड्याने देववणे | award | [क. २६ (१) ] |
| निवेदन | statement | [क. १९-स.टी.] |
| निवेदन करणे | state | [क. १९ (१) ] |
| निषेध नोंदवून | under protest | [क. ३१ (२) परंतुक] |
| न्यायोचित | equitable | [क. ३१ (३) ] |
| परत देणे | restore | [क. ३६ (२) ] |
| पात्र | channel | [क. १७ (२) ] |
| पुरेपूर आणि अबाधित उपयोग | full and unimpaired use | [क. ४९ (१) शेवटचा परिच्छेद] |
| प्रतलमापन करणे | take levels | [क. ४ (२) ] |

| | | |
|---|---|---|
| प्रदान | payment | [भाग पाच-शीर्षक] |
| बंदिस्त आवार | enclosed court | [क. ४-परंतुक] |
| बांधकाम पुरे करणे | execute a work | [क. ४१ (४क) ] |
| भरपाई | compensation | [क. ११ (१) ] |
| भूमि | land | [क. ३१ (३) ] |
| माघार घेणे | withdraw | [क. ४८ (१) ] |
| मान्य रोखे | approved securities | [क. ३२ (१) (ख) ] |
| विल्हेवाट | disposal | [क. २४ (सात) ] |
| व्यवस्था करणे | make arrangement | [क. ३१ (३) ] |
| शासकीय कंपनी | Government company | [क. ४४ ख-स्पष्टी] |
| संविभाजन | apportionment | [क. ११ (१) (तीन) ] |
| सक्तीने स्वाधीन करवणे | enforce the surrender | [क. ४७] |
| संचित करणे | accumulate | [क. ३३] |
| समुचित शासन | appropriate Government | [क. ३ (ड्ड्) ] |
| संपादन | acquisition | [भाग दोन-शीर्षक] |
| सर्वेक्षण | survey | [क.४ (२) ] |
| सार्वजनिक प्रयोजन | public purpose | [क. ३ (च्) ] |
| सीमा आखणे | set out the boundaries | [क. ४ (२) ] |
| सीमांकित करणे | mark out | [क. ८ ] |
| सुखसोयी | amenities | [क. ४० (१) (क्) ] |
| सुधारणा | improvement | [क. २४ (सात) ] |
| स्थितिस्थान | situation | [क. १९ (१) (क्) ] |
| हितसंबंधित व्यक्ती | person interested | [क ३(ख्) ] |
| क्षेत्रफळ | area | [क. १२ (१) ] |

# THE LAND ACQUISITION ACT, 1894

## भूमिसंपादन अधिनियम, १८९४

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| accumulate | | संचित करणे | [S. 33] |
| acquisition | | संपादन | [Part II—heading] |
| agreement | | करारनामा | [S. 39] |
| alienate | | अन्यक्रामण करणे | [S. 32(*1*)] |
| amenities | | सुखसोयी | [S. 40(*1*)(*a*)] |
| apportionment | | संविभाजन | [S. 11(*1*)(*iii*)] |
| appropriate Government | | समुचित शासन | [S. 3(*ee*)] |
| approved securities | | मान्य रोखे | [S. 32(*1*)(*b*)] |
| area | | क्षेत्रफळ | [S. 12(*1*)] |
| award | n. | निवाडा | [S. 11(*1*)] |
| | v.t. | निवाड्याने देववणे | [S. 26(*1*)] |
| case of urgency | | निकडीचे प्रकरण | [S. 17-m.n.] |
| channel | | पात्र | [S. 17(*2*)] |
| compensation | | भरपाई | [S. 11(*1*)] |
| construction of building | | इमारत बांधणे | [S. 40(*1*)(*aa*)] |
| costs | | खर्च | [S. 27-m.n.] |
| deposit | | जमा करणे | [S. 31-m.n.] |
| disinclination | | नाखुषी | [S. 24 (Secondly)] |
| disposal | | विल्हेवाट | [S. 24 (Seventhly)] |
| enclosed court | | बंदिस्त आवार | [S. 4-proviso] |
| enforce the attendance | | उपस्थित राहण्यास भाग पाडणे | [S. 14] |
| enforce the surrender | | सक्तीने स्वाधीन करवणे | [S. 47] |
| entitled to act | | काम चालवण्यास हक्कदार | [S. 3(*g*)] |
| equitable | | न्यायोचित | [S. 31(*3*)] |
| execute a work | | बांधकाम पुरे करणे | [S. 41(*4A*)] |
| form of award | | निवाड्यांचे प्ररूप | [S. 26-m.n.] |
| full and unimpaired use | | पुरेपूर आणि अबाधित उपयोग | [S. 49(*1*)-last para] |
| Government company | | शासकीय कंपनी | [S. 44B-expl.] |
| improvement | | सुधारणा | [S. 24 (Seventhly)] |
| industrial concern | | औद्योगिक संस्था | [S. 38A] |
| in prosecution of the proceedings | | कार्यवाही चालू असताना | [S. 48(*2*)] |
| land | | १. भूमि | [S. 31(*3*)] |
| | | २. जमीन | [S. 3(*a*)] |
| make arrangement | | व्यवस्था करणे | [S. 31(*3*)] |
| mark out | | सीमांकित करणे | [S. 8] |
| navigable river | | नाव्य नदी | [S. 17(*2*)] |

| | | |
|---|---|---|
| occupation | ताबा | [ Part VI-heading ] |
| occupation and use | ताबा घेणे व वापर करणे | [ S. 35 (*1*) ] |
| occupier | ताबाधारक | [ S. 4-proviso ] |
| outlay | खर्च | [ S. 24 (Seventhly) ] |
| payment | प्रदान | [ Part V-heading ] |
| person interested | हितसंबंधित व्यक्ती | [ S. 3 (*b*) ] |
| Private company | खाजगी कंपनी | [ S. 44B-expl. ] |
| proceeds | उत्पन्न | [ S. 32(*2*) (*b*) ] |
| public purpose | सार्वजनिक प्रयोजन | [ S. 3 (*f*) ] |
| reference | निर्देशन | [ S. 18-m.n. ] |
| restore | परत देणे | [ S. 36 (*2*) ] |
| river-side or ghat station | नदीच्या काठावरील किंवा घाटावरील स्थानक. | [ S. 17 (*2*) ] |
| set out the boundaries | सीमा आखणे | [S. 4 (*2*) ] |
| situation | स्थितिस्थान | [ S. 19 (*1*) (*a*) ] |
| state | निवेदन करणे | [ S. 19 (*1*) ] |
| statement | निवेदन | [ S. 19-m.n. ] |
| sub-soil | अंतर्मृदा | [ S. 4 (*2*) ] |
| survey | सर्वेक्षण | [ S. 4 (*2*) ] |
| take levels | प्रतलमापन करणे | [ S. 4 (*2*) ] |
| under protest | निषेध नोंदवून | [ S. 31 (*2*) 1st proviso ] |
| urgency | निकड | [ S. 24 (first) ] |
| withdraw | माघार घेणे | [ S. 48 (*1*) ] |
| work for a company | कंपनीकरिता बांधकाम करणे. | [ S. 40 (*1*) (*aa*) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई